Since 1965
SONI TILES
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. १९.०८.२०२६ | अंक नं. ११९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



नगरची अस्सल गुजराथी थाळी
४० वर्षांपासून आपल्या सेवेत..
आता आणखी एक थाळी सोबत नवीन थाळी...
दाल बाटी चुरमा थाळी...
फॅमिली करिता स्वतंत्र व्यवस्था..
पार्सल सुविधा उपलब्ध
Home Delivery Via zomato
गुजराथी थाळी
(दर बुधवारी व रविवारी)
उपाध्याय बंधू यांचे
गुजराथ भोजनालय
शाखा- इंदौर ● धुळे ● मालेगांव ● नाशिक



स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉइंट | पॉइंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090



चलो दुबई
खरेदी सोन्याची, होईल भाग्याची..
सोने-चांदीच्या खरेदीवर स्क्रॅचकार्डव्दारे
जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स
₹50000/- सोने खरेदीवर
₹20000/- चांदी खरेदीवर
₹5000/- भिशी योजनेत सहभागी व्हा.
₹5000/- फॉर्मिंग ज्वेलरीच्या खरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे जिंका दुबई ट्रिप किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच मजुरीही सर्वात कमी.
22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
₹999/-*
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु


# शहरात अल्पवयीन मुले सुसाटपणे चालवितात वाहने

## अपघातांचा धोका; मुलांसह पालकांनाही वाटेना कायद्याचा धाक

नगर – अहिल्यानगर शहरात सध्या अल्पवयीन मुले १८ वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच भरधाव वेगाने वाहने चालवत असल्याचे चित्र सर्वत्र पाहायला मिळत आहे. शाळा-कॉलेजच्या वेळेत तसेच मुख्य रस्त्यांवर ही मुले सुसाट वाहने पळवत असल्याने शहरात अपघाताचा धोका वाढला आहे. विशेष म्हणजे, या गंभीर प्रकाराकडे अहिल्यानगर शहर वाहतूक शाखेचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप शहरातील नागरिक व व्यावसायिकांकडून केला जात आहे.

अनेक प्रकरणांमध्ये मुलांच्या या कृत्याला पालकांचीच फूस असल्याचे समोर येत आहे. अल्पवयीन मुले हट्ट करतात म्हणून पालक त्यांना महागड्या बाईक्स किंवा स्कुटी सर्रास चालवण्यासाठी देतात. आपल्या पाल्याच्या सुरक्षिततेचा विचार न करता वाहन देणाऱ्या अशा पालकांनाही कायद्याचा काही धाक वाटतोय की नाही, असाच प्रश्न उपस्थित होत आहे.

मोटार वाहन कायद्यानुसार १८ वर्षे पूर्ण नसलेली व्यक्ती (अल्पवयीन) वाहन चालवण्यास कायदेशीररित्या पात्र नाही. या नियमाचे उल्लंघन झाल्यास अत्यंत कठोर शिक्षेची तरतूद आहे. अल्पवयीन मुलाने अपघात केल्यास किंवा वाहन चालवताना पकडल्यास केवळ मुलावर नव्हे, तर थेट पालकांवर आणि वाहन मालकावर गुन्हा दाखल केला जातो. अशा प्रकरणात पालकांना २५ हजार रुपयांपर्यंतचा दंड आणि ३ वर्षांपर्यंतचा कारावासदेखील होऊ शकतो. संबंधित वाहनाची नोंदणी एक वर्षासाठी रद्द केली जाऊ शकते. असे कडक नियम अस्तित्वात असताना पोलिसांनी पकडल्यानंतर किरकोळ कारवाई करून किंवा समज देवून या मुलांना सोडले जाते. त्यामुळे त्यांचे धारिष्ट्य वाढते आणि ते पुन्हा सुसाट वेगाने सुटतात, असे चित्र शहरात दिसून येते.

मुलगा सज्ञान झाल्यानंतरच (१८ वर्षे पूर्ण झाल्यावर) त्याला कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करूनच वाहन चालविण्यास द्यावे, अशी सक्त भूमिका शहरातील सुजाण नागरिक आणि व्यापारी व्यक्त करीत आहेत. वाहतूक पोलिसांनी आता केवळ बघ्याची भूमिका न घेता, विनापरवाना वाहन चालवणारी अल्पवयीन मुले, मॉडिफाइड सायलेन्सर वापरणारे चालक आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या पालकांवर धडक मोहीम राबवून कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

### मॉडिफाइड सायलेन्सरचा दणदणाट आणि ध्वनी प्रदूषण

शहरातील मुख्य बाजारपेठा, सावेडी परिसर आणि रहिवासी भागात अनेक अल्पवयीन मुले दुचाकींचे मूळ सायलेन्सर बदलून मॉडिफाइड सायलेन्सर बसवितात आणि वाहन चालविताना मोठ्या आवाजात फटाक्यासारखे आवाज काढत फिरतात. यामुळे नागरिक, ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थ्यांना तीव्र मनस्ताप सहन करावा लागत असून, मोठ्या प्रमाणावर ध्वनी प्रदूषण होत आहे. या परिसरात असलेल्या रुग्णालयांना आणि रुग्णांना देखील या सायलेन्सरचा त्रास सहन करावा लागतो. या प्रकारावर पोलिसांकडून मोहिम राबवून कारवाईची मागणी होत आहे.



नगर-मनमाड महामार्गावर सावेडी परिसरात वाहन चालविताना अल्पवयीन मुले. (छाया – धनेश कटारिया)

# नालेगावात नागपंचमीच्या गर्दीमध्ये महिलेचे मंगळसूत्र चोरट्यांनी लांबवले

नगर – नालेगाव परिसरातील प्रसिद्ध वारुळाचा मारुती मंदिरात नागपंचमीनिमित्त दर्शनासाठी आलेल्या एका महिलेचे सोन्याचे मंगळसूत्र अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन लंपास केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पुनम गणेश गडाख (वय ३५, रा. रोहकले गल्ली, नालेगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या १७ ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास आपल्या कुटुंबासह नालेगावातील वारुळाचा मारुती मंदिरात नागपंचमीच्या पंचांब्यानिमित्त दर्शनासाठी गेल्या होत्या. त्यावेळी मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होती. या गर्दीचा गैरफायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील तीन ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र (ज्यामध्ये दोन वाट्या व चार मणी होते) अत्यंत शिताफीने चोरून नेले.

घरी आल्यानंतर मंगळसूत्र चोरीला गेल्याचे फिर्यादी पुनम गडाख यांच्या लक्षात आले. त्यांनी परिसरात शोध घेतला असता मंगळसूत्र मिळून आले नाही. अखेर त्यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात जाऊन अज्ञात चोरट्याविरुद्ध फिर्याद नोंदवली. याफिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार बाळासाहेब भापसे करत आहेत.

# मुकुंदनगरच्या सहारा सिटीतील नूर लॉन्सला मनपाची नोटिस

## अमेनिटी प्लॉटवर 'लॉन्स' सुरू ठेवल्यास कायदेशिर कारवाईचा इशारा

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या हद्दीतील सहारा सिटी परिसरातील सर्वे नं. ३३३/१/२ व ३३४/१/२ येथे महानगरपालिकेची परवानगी कन्व्हेन्शनल सेंटर म्हणून घेण्यात आली असताना तेथे लॉन्स उभारुन त्याचा व्यावसायिक वापर केला जात असल्याची तक्रार महापालिकेकडे प्राप्त होताच महापालिकेने नूर लॉन्सला नोटीस बजावून वापर थांबविण्याची तंबी दिली आहे.

याबाबत मुकुंदनगरमधीलच एका नागरिकांनी महापालिकेकडे तक्रार केली होती. त्यानुसार या अमेनिटी प्लॉटचा अनधिकृतपणे नूर लॉन्स म्हणून वापर केला जात होता. रहिवासी भागात मोठ्या प्रमाणात लग्नसमारंभ व इतर कार्यक्रम आयोजित केले जात असल्याने परिसरातील रहिवाशांना विविध अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे या तक्रारीत म्हटले आहे. सहारा सिटी हा रहिवासी परिसर असल्याने येथे मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या विवाह सोहळ्यांमुळे वाहतूक कोंडी, वाहनांची गर्दी, मोठ्या आवाजातील ध्वनिक्षेपक, पार्किंगची समस्या तसेच नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होणारा परिणाम याबाबत रहिवाशांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. रहिवासी परिसरातील नियोजित वापराच्या नियमांचे उल्लंघन होत असल्यास त्यावर प्रशासनाने तत्काळ कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली होती.





महापालिकेने कन्व्हेन्शनल सेंटर म्हणून परवानगी दिलेल्या जागेवर सुरु केले नूर लॉन्स.

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन अहिल्यानगर महानगरपालिका प्रशासनाने संबंधित नूर मोहम्मद आबीद शेख यांना स्पष्ट आदेश दिले आहेत. संबंधित जागेचा नूर लॉन्स म्हणून वापर करू नये, असे महानगरपालिकेने बजावले आहे.

तसेच संबंधित अमेनिटी प्लॉटवर नूर लॉन्स म्हणून वापर सुरु ठेवल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. महानगरपालिकेने रहिवासी भागात मोठ्या कार्यक्रमांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर प्रशासनाने भूमिका घेतल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

# राज्यातील एसआयआरचा टप्पा पूर्ण; तब्बल २ कोटी मतदार अपात्र

## काही स्थलांतरित, काही अनुपस्थित तर काही मृत आढळले

मुंबई – राज्यातील मतदारयादीच्या विशेष सखोल पडताळणीचा (एसआयआर) टप्पा पूर्ण झाला असून, या प्रक्रियेत तब्बल २ कोटी ७ लाख मतदारांची नावे प्रारूप यादीत समाविष्ट करण्यास अपात्र ठरल्याचे स्पष्ट झाले आहे.

आयोगाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, राज्यातील एकूण ९.७८ कोटी मतदारांपैकी २ कोटी ७ लाख मतदारांचे गणना अर्ज संकलित होऊ शकले नाहीत. हे प्रमाण एकूण मतदारसंख्येच्या २१.१५ टक्के आहे. यापैकी ७५.५२ लाख मतदार अनुपस्थित आढळले किंवा त्यांचा शोध लागला नाही. ७६.८० लाख मतदार कायमस्वरूपी स्थलांतरित झाल्याचे आढळून आले. तर ३४.८१ लाख मतदार मृत असल्याची नोंद झाली. याशिवाय १७.६३ लाख मतदारांची नावे अन्यत्र नोंदलेली किंवा दुबार असल्याचे समोर आले आहे.

एसआयआर अंतर्गत ३० जून ते १७ ऑगस्ट या कालावधीत बूथस्तरीय अधिकाऱ्यांनी घरोघरी जाऊन गणना अर्ज जमा केले. या मोहिमेनंतर असंकलित मतदारांच्या तात्पुरत्या याद्या संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. राजकीय पक्षांच्या बूथस्तरीय प्रतिनिधींनाही या मतदारांबाबत माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दुरुस्तीसाठी फॉर्म ८, तर मतदाराचे नाव वगळण्यास हरकत नोंदविण्यासाठी फॉर्म ७ दाखल करता येईल. पात्र मतदारांकडून आवश्यक अर्ज मिळवून त्यांची बूथस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत पडताळणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे निवडणूक विभागाकडून सांगण्यात आले.

दरम्यान प्रारूप मतदारयादी २४ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर मतदारांना दावे आणि हरकती नोंदविण्यासाठी महिनाभराची मुदत दिली जाणार आहे. यादीत नाव नसलेल्या पात्र मतदारांना, तसेच १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांना फॉर्म ६ भरून नाव नोंदविता येणार असल्याचेही जाहीर करण्यात आले आहे.


CCTV CAMERA
बिघडला आहे का?
फक्त एकच कॉल
ISO 9001 : 2015 Certified
Mandar Mulay
Cell : 98222 94622 | 94220 87757
www.mandarmulay.com



पाऊल टाका स्टाईलमध्ये!
आमच्याकडे उपलब्ध पादत्राणांचे प्रकार
पुरुषांसाठी पादत्राणे | महिलांसाठी पादत्राणे | मुलांसाठी पादत्राणे
क्रॉक्स (Crocs), क्लॉग्स स्लायडर्स, फ्लिप-फ्लॉप्स,
स्नीकर्स,कॅज्युअल शूज, ब्रँडेड पादत्राणे, फॉर्मल शूज,
स्पोर्ट्स शूज, फ्लोटर्स, घरातील वापरासाठी चप्पल,
बाहेरील वापरासाठी चप्पल व शूज वरांसाठी (ग्रूम) पादत्राणे
वधूसाठी (ब्रायडल) पादत्राणे, मोजडी, कोल्हापुरी चप्पल..
खास मान्सून धमाका!
ही जाहिरात दाखवा आणि प्रत्येक खरेदीवर मिळवा १०% सूट!
१००% ओरिजनल लेदर आणि कोल्हापुरी चपला
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE
शू पॅलेस
सारडागल्ली, अ.नगर, मो : 9881531536

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर एकाच दिवशी ११ ठिकाणी छापे

नगर - जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध व्यवसायांवर कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. या आदेशांनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी तीन विशेष पथके तयार करून त्यांना कारवाईसाठी मैदान उतरवले. याच मोहिमेअंतर्गत १८ ऑगस्ट रोजी पोलिसांनी एकाच दिवशी ११ ठिकाणी छापे टाकून धडक कारवाई केली आहे.

पोलिस उपनिरीक्षक संदीप दरवडे यांच्यासह नेमण्यात आलेल्या पथकांमध्ये निळकंठ कारखेले, सोमनाथ झांबरे, राहुल डोके, बाळासाहेब गुंजाळ, रणजीत जाधव, सुनील मालणकर, भगवान धुळे, बाळासाहेब नागरगोजे, भगवान सानप, आजीनाथ पाखरे, किशोर शिरसाठ, महादेव भांड, राहुल द्वारके, शाहीद शेख, अभिजीत अरकल, अरुण गांगुर्डे, अशोक लिपणे आणि योगेश कर्डीले आदी पोलीस अंमलदारांचा समावेश होता.

या पथकांनी संगमनेर शहर, नेवासा आणि श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशन हद्दीत कसून शोधमोहीम राबवत अवैध व्यवसायांची माहिती गोळा केली. यानंतर एकाच दिवशी तब्बल ११ वेगवेगळ्या ठिकाणी धाडी टाकण्यात आल्या. यामध्ये ४४,६५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# परदेशी हत्याकांड प्रकरणात संग्राम जगतापांची नार्को टेस्ट करा

### शिवसेनेच्या ठाकरे गटाची मागणी; शहरप्रमुख किरण काळे यांनी केले गंभीर आरोप



नगर - धीरज परदेशी हत्याकांडाच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणातील आरोपींचे पाकिस्तान आणि फिलिस्तीनशी कथित संबंध, पोलिस तपासाची दिशा, हिंदूंच्या घरांवर कथित अतिक्रमण, तसेच धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या घटनांबाबत सत्ताधारी आमदारांनी केलेल्या आरोपांवरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आक्रमक झाली आहे. पक्षाचे शहरप्रमुख किरण काळे यांनी १८ ऑगस्ट रोजी मुंबईत पत्रकार परिषद घेत राज्य सरकार आणि पोलिस यंत्रणेकडे विविध मागण्या केल्या. परदेशी हत्याकांड प्रकरणात संग्राम जगतापांची नार्को टेस्ट करण्याची मागणी यावेळी काळे यांनी केली.

काळे यांनी सांगितले की, ७ ऑगस्ट रोजी धीरज परदेशी यांच्यावर हल्ला झाला, ९ ऑगस्ट रोजी त्यांचे निधन झाले आणि १० ऑगस्ट रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेनंतर १० ऑगस्ट रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संग्राम जगताप यांच्या आवाहनावरून रास्ता रोको आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात आंदोलनाऐवजी तेथे राजकीय सभा झाल्याचा आरोप त्यांनी केला. या सभेत आमदार संग्राम जगताप आणि आमदार अक्षय कर्डिले यांनी केलेल्या वक्तव्यांवरही काळे यांनी तीव्र टीका केली.

काळे यांनी आरोप केला की, या सभेच्या माध्यमातून धार्मिक तेढ निर्माण होण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, अहिल्यानगर पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवत संभाव्य अनुचित घटना टाळल्याबद्दल त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमका, अतिरिक्त पोलीस अधीक्षक, शहर डीवायएसपी आणि संपूर्ण पोलिस दलाचे कौतुक केले. अहिल्यानगर पेटण्यापासून वाचविण्याचे काम पोलिसांनी केले, असे काळे म्हणाले.

### पाकिस्तान-फिलिस्तीन कनेक्शनच्या आरोपांची चौकशी करा

धीरज परदेशी हत्याकांडातील आरोपींचे पाकिस्तान किंवा फिलिस्तीनशी संबंध असल्याचे आरोप आ. संग्राम जगताप आणि संग्राम भंडारे यांनी केल्याचा दावा करत काळे यांनी या आरोपांना गंभीर स्वरूपाचे असल्याचे म्हटले. जर हे आरोप खरे असतील, तर राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने त्याची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर संबंधित नेत्यांना पोलिसांनी नोटीस बजावून त्यांचे जबाब नोंदवावेत, त्यांच्याकडील कथित पुरावे ताब्यात घ्यावेत आणि आवश्यक असल्यास पुढील तपास राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए) कडे सोपवावा, अशी मागणी मुंबईत राज्याच्या पोलीस महासंचालकांकडे काळे यांनी केली आहे.

### हिंदूंच्या घरांबाबतच्या आरोपांवर एसआयटीची मागणी

अहिल्यानगरमध्ये हिंदूंची घरे धमकावून किंवा दादागिरी करून बळकावली जात असल्याचा आरोप आमदार गोपीचंद पडळकर यांनी केला होता. या प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची मागणी पडळकर आणि इतर आमदार मुख्यमंत्र्यांकडे करणार असल्याचे सांगण्यात आले होते; मात्र त्याबाबत पुढील माहिती समोर आलेली नसल्याचे काळे म्हणाले. हा आरोप सत्ताधारी आमदारांनीच केला आहे. त्यामुळे सरकारने स्वतःहून या आरोपांची चौकशी करण्यासाठी एसआयटी स्थापन करावी, अशी मागणी काळे यांनी शिवसेनेच्या वतीने मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देऊन केली आहे.

### 'दंगल नको, तरुणांना रोजगार द्या'

अहिल्यानगरमध्ये राजकीय सभांसाठी नितेश राणे, गोपीचंद पडळकर, संग्राम भंडारे अशा प्रकारच्या भडकाऊ भाषण करणाऱ्या बाहेरील नेत्यांना बोलावण्या ऐवजी तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर भर द्यावा, असे आवाहन काळे यांनी केले. शहरात कायदा-सुव्यवस्था बिघडविण्याची शक्यता असल्यास बाहेरून येणाऱ्या नेत्यांवर कायदेशीर निर्बंध घालण्याबाबत पोलिसांनी योग्य ती भूमिका घ्यावी, असेही काळे म्हणाले.

### धीरजच्या कुटुंबीयांना मदत कधी मिळणार?

धीरज परदेशी याच्या कुटुंबीयांना आतापर्यंत कोणतीही आर्थिक मदत राज्य सरकारकडून करण्यात आलेली नाही. कुटुंबीयांना नोकरी देण्याबाबत जी काही वक्तव्य केली गेली त्यावरही कोणतीही कार्यवाही आतापर्यंत झालेली नाही याकडे यावेळी काळेंनी लक्ष वेधून केवळ भाषण बाजी न करता प्रत्यक्षात तुमच्या हाती सरकार असल्यामुळे त्या माध्यमातून मदत करावी याचा पुनरुचार यावेळी केला.

# हिंदूना शस्त्रे उचलण्यास प्रशासनाने भाग पाडू नये

### आ.संग्राम जगताप यांचा इशारा; स्थानिक पोलिसांच्या भूमिकेवर पुन्हा उपस्थित केले प्रश्नचिन्ह



नगर - राज्यात जर ८ महिन्यात तब्बल ३७ हिंदूंच्या हत्या मुसलमान करत असतील तर राज्यात हिंदूंच्या सुरक्षिततेचा फार मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. भविष्यात जर या परिस्थितीत बदल झाला नाही तर प्रभू श्री रामाचे धनुष्य, छत्रपती शिवाजी महाराजांची तलवार व हनुमानाची गदा उचलण्यास प्रशासनाने हिंदू समाजाला भाग पाडू नये, असा गंभीर इशारा अहिल्यानगरचे आ. संग्राम जगताप यांनी पोलीस प्रशासनाला दिला.

कर्जत रास्तारोको प्रकरणी माझ्यावर गुन्हा दाखल झाल्याने मी हे कार्य थांबवणार नसून आशा गुन्ह्याने काही फरक पडत नाही. आंदोलन करणाऱ्यांचे कार्य स्वातंत्र्यपूर्व काळापासून थांबवण्याचा प्रयत्न चालू आहे. पण ते थांबलेले नाहीये. त्यामुळे स्थानिक पोलीस प्रशासनास सांगू इच्छितो की, अशा गुन्ह्याने मी खचून न जाता धर्मासाठीचे काम चालूच ठेवणार आहे. धीरज परदेशी प्रकरणातही प्रशासनाने समोरच्यांना झुकते माप दिले आहे. पोलिसांनी अद्याप आरोपींची हिस्ट्री न सांगितल्याने त्यांच्या भुमिकेबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलिसांनी जनतेची दिशाभूल न करता आरोपींची खरी हिस्ट्री न लपवता जनतेपुढे आणावी, अशी मागणी केली.

आ. संग्राम जगताप यांनी मंगळवारी प्रसिद्धी माध्यमांशी संवाद साधून आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, कर्जत येथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची विटंबना ज्या जीहाद्याने केली त्याला अटक न करता तेथील हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांवरच पोलिसांनी गुन्हे दाखल केले. प्रतिमेच्या विटंबना घटनेच्या निषेधार्थ रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा देताच पोलिसांनी विटंबना करणाऱ्यांना अटक केली. घटना घडून चार पाच दिवस झाले तरी कडक कारवाई न करता मझ्यासह अनेक हिंदुंवर गुन्हे दाखल झाले; याचा अर्थ तेथील स्थानिक पोलिसांचीही भूमिका हिंदूंनाच टार्गेट करण्याची आहे. नगरमध्ये धीरज परदेशीची व सांगली येथेही एका हिंदू पती-पत्नीची हत्याही अत्यंत क्रूरतेने करण्यात आली. जानेवारी पासून आजपर्यंत वारंवार अशा घाटनांमध्ये राज्यात तब्बल ३७ हिंदूंची हत्या मुसलमानांनी केल्या आहेत. याचा अर्थ कुठेतरी हिंदूनाच टार्गेट केले जात आहे. या बाबतीत मी लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेऊन खरी वस्तूस्थिती सांगून हिंदू नागरिक व धर्मासाठी काम करणारेच आज सुरक्षित नाहीये ही भूमिका मांडणार आहे. स्थानिक पोलीस प्रशासन कशा पद्धतीने काम करत आहे याचीही वस्तूस्थितीही मुख्यमंत्र्यांच्या कानावर घालणार आहे.

आ. जगताप म्हणाले, कर्जत रास्तारोको प्रकरणी माझ्यावर गुन्हा दाखल झाल्याने मी हे कार्य थांबणार नसून आशा गुन्ह्याने काही फरक पडत नाही. आंदोलन करणाऱ्यांचे कार्य स्वातंत्र्यपूर्व काळापासून थांबवण्याचा प्रयत्न चालू आहे. पण ते थांबलेले नाहीये. त्यामुळे स्थानिक पोलीस प्रशासनास सांगू इच्छितो की, आशा गुन्ह्याने मी खचून न जाता धर्मासाठीचे काम चालूच ठेवणार आहे. धीरज परदेशी प्रकरणात प्रशासनाने आरोपींना झुकते माप दिले आहे. पोलिसांनी अद्याप आरोपींची कुठलीच माहिती व त्यांची हिस्ट्री न सांगितल्याने त्यांच्या भूमिकेवर बाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलिसांनी जनतेची दिशाभूल न करता आरोपींची खरी हिस्ट्री न लपवता जनतेपुढे आणावी, अशी मागणी केली.

# एसटी महामंडळाच्या लिपिकाचे अपहरण करत केली मारहाण

### मोबाईल व रोकडही लुटली, अनोळखी तिघांवर गुन्हा दाखल

नगर - शहरातील पुणे बसस्थानक परिसरातून एसटी महामंडळातील एका लिपिकाचे काळ्या दुचाकीवरून अपहरण करून, त्यांना बुरुडगाव रस्त्यावर नेऊन बेदम मारहाण करत लुटल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात तीन अनोळखी तरुणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संग्राम गोपाळकृष्ण झेंडे (वय ३३, रा. चिखली, ता. श्रीगोंदा) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे एसटी महामंडळात लिपिक आहेत. ते १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी सातच्या सुमारास पुणे बसस्थानक परिसरात थांबलेले होते. त्यावेळी काळ्या रंगाच्या दुचाकीवरून आलेल्या २२ ते २३ वर्षे वयाच्या तीन अज्ञात तरुणांनी झेंडे यांना जबरदस्तीने दुचाकीवर बसवले.

त्यानंतर आरोपींनी झेंडे यांना बुरुडगाव रस्त्याकडे नेऊन शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण केली. आरोपींनी झेंडे यांचा महागडा मोबाईल हिसकावून घेतला व त्यांना मारहाण करून ऑनलाईन पेमेंटचा पासवर्ड विचारला. त्यानंतर आरोपींनी एका दुकानाच्या खात्यावर ७,१०० रुपये ऑनलाईन पाठवून ती रक्कम लुबाडली. संग्राम झेंडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांनी अज्ञात तीन आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दीपक मेढे करत आहेत.

# जिल्हा बँकेसाठी १५ सप्टेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द होणार

### प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध, हरकतींसाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदत

नगर - गेल्या चार महिन्यांपासून प्रशासक असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक संभाजी निकम यांनी १९ ऑगस्ट रोजी निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली असून येत्या ३१ ऑगस्टपर्यंत हरकती व सुचना करण्याची मुदत देण्यात आली आहे. अंतिम मतदार यादी १५ सप्टेंबरला प्रसिद्ध होणार असून त्यानंतर बँकेच्या २१ संचालकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होईल. दरम्यान, यंदा निवडणुकीसाठी बँकेचे ३ हजार ६७७ मतदार आहेत. त्यात ३६६ संस्थेचे ठराव अपात्र ठरले असून २३३ संस्थांनी ठराव सादर केले नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकांची मुदत २० फेब्रुवारी रोजी संपुष्टात आली. मात्र, मे महिन्यात बँकेवर प्रशासक मंडळ नियुक्त करण्यात आले होते. त्यानंतर जून महिन्यात विविध कार्यकारी सेवा सोसायट्या, कृषी पणन संस्था व शेतमाल प्रक्रिया संस्था (शेती पुरक मतदारसंघ) व बिगर शेती संस्था मतदारसंघा अशा संस्थाचे १६ जुन ते १६ जुलैपर्यंत ठराव मागविण्यात आले होते. त्यानुसार निवडणूक अधिकारी निकम यांच्याकडे जिल्हा बँकेने ५ हजार ८९० सभासदांची (मतदारांची यादी) पाठवली होती. यातून ठराव उपलब्ध झालेल्या विविध कार्यकारी सेवा सोसायटी संस्थांचे १ हजार ३६७, बिगर शेती मतदारसंघातून १ हजार ५९५ तर शेती पुरक मतदारसंघातून १ हजार ५१ असे ४ हजार १३ संस्थांचे ठराव निवडणूक निर्णय अधिकारी निकम यांच्या उपलब्ध करून देण्यात आले होते. यातून निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या यंत्रणेने तपासून ३६६ ठराव अपात्र केले. त्यात विविध कार्यकारी सेवा सोसायटी संस्थांचे ७, बिगर शेती मतदारसंघाचे १२४ तर शेती पुरक मतदारसंघाचे २३५ यांचा सामवेश आहे. तर २३३ संस्थांनी ठराव दिले नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यात विविध कार्यकारी सेवा सोसायटी संस्थांचे २७, बिगर शेती मतदारसंघाचे १५६ तर शेती पुरक मतदारसंघाचे ५० संस्थांचा समावेश आहे. त्यामुळे बँकेच्या निवडणुकीसाठी आता सेवा सोसायटी मतदारसंघ, बिगरशेती मतदारसंघ आणि शेती पूरक मतदारसंघातून ३ हजार ६४७ आणि ३० व्यक्तीगत असे ३ हजार ६७७ मतदार निश्चित झाले आहेत.

# ग्रामसेवकांचा अनिश्चित काळासाठी ग्रामसभांवर बहिष्कार

### पंचायत समिती समोर निदर्शने करत शिंदे येथील घटनेचा नोंदवला निषेध



नगर पंचायत समिती समोर निदर्शने करत शिंदे येथील घटनेचा निषेध नोंदवताना ग्रामसेवक संघटनेचे पदाधिकारी.

नगर - ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून, ग्रामसभेदरम्यान अधिकारी व कर्मचाऱ्यांना धमकी, शिवीगाळ, धक्काबुक्की तसेच मारहाणीच्या घटनांना सामोरे जावे लागत आहे. याच पार्श्वभूमीवर जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील शिंदे येथे ग्रामसभेदरम्यान ग्रामपंचायत अधिकारी पी. एन. पाटील यांचा झालेला दुर्दैवी मृत्यू ही घटना संतापजनक असून, या घटनेचा निषेध करण्यासाठी ग्राम सेवक संघटनेने १८ ऑगस्टपासून अनिश्चित काळासाठी ग्रामसभांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

याबाबतचे निवेदन नगर तालुका पंचायत समितीच्या कार्यालयात गटविकास अधिकारी अक्षय गारडे व तहसीलदार ग. दि. कुलथे यांना देण्यात आले. यावेळी ग्रामसेवक संघटनेचे श्रीपाद फलके, अशोक जगदाळे यांच्यासह ग्रामसेवक उपस्थित होते.

शिंदे, ता. पारोळा, जि. जळगाव येथे आयोजित ग्रामसभेदरम्यान ग्रामपंचायत अधिकारी पी. एन. पाटील यांच्यासोबत घडलेल्या दुर्दैवी घटनेने ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ग्रामसभा ही लोकशाही व्यवस्थेतील महत्त्वाची प्रक्रिया असली, तरी ग्रामसभेच्या कर्तव्यावर असलेल्या अधिकाऱ्यांना सुरक्षित वातावरण मिळणे ही शासनाची जबाबदारी आहे.

ग्रामपंचायत अधिकारी शासनाच्या विविध योजना व कार्यक्रमांची गावपातळीवर अंमलबजावणी करतात. मात्र काही ठिकाणी असामाजिक घटकांकडून अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात खोट्या व तथ्यहीन तक्रारी केल्या जात असून, त्यांच्यावर अनावश्यक प्रशासकीय व सामाजिक दबाव आणला जात असल्याचे संघटनेने निवेदनात म्हटले आहे. सोशल मीडियावर ग्रामपंचायतीच्या कामकाजाचे चुकीचे व्हिडिओ प्रसारित करून संस्थेची प्रतिमा मलिन करण्याचे प्रकारही होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.


अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, तसेच आवश्यक प्रशासकीय सूचना तातडीने निर्गमित कराव्यात, अशी मागणी संघटनेने केली आहे.

# अहिल्यानगर वाचनालयाच्यावतीने जिल्ह्यातील विविध ग्रंथपालांचा सन्मान

नगर - वाचन चळवळीचे प्रणेते डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित राष्ट्रीय ग्रंथपाल दिनी अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने नगर जिल्ह्यातील विविध वाचनालयातील ग्रंथपालांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमात ग्रंथपाल रेणुका पालवे, प्रा. संगीता निमसे, स्वाती कडनोर, शीला बारावकर, सुवर्ण बोरनारकर, संदीप नन्नवरे, अमोल इथापे, नितीन भारताल, भाग्यश्री पांढरे, पल्लवी कुक्कडवाल, वर्षा जोशी, संजय गाडेकर, आर्यन मड्डुर, ओम केदारे आदीचा सन्मान करण्यात आला. यावेळी वाचनालयाचे उपाध्यक्ष दिलीप पांढरे, खजिनदार तनवीर खान, सहकार्यवाह राहुल तांबोळी, संचालिका शिल्पा रसाळ, कार्यक्रमाचे संयोजक किरण आगरवाल, कवी चंद्रकांत पालवे, वाचनालयाचे ग्रंथपाल अमोल इथापे, सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल आदींसह जिल्ह्यातील विविध वाचनालयाचे ग्रंथपाल उपस्थित होते.

# यशवंत देवधर यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर - श्रीरामपूर येथील सरस्वती कॉलनीतील रहिवासी श्रीरामपूर न.प. चे सेवानिवृत्त क्लार्क यशवंत बळवंत देवधर (वय ७६) यांचे १९ ऑगस्ट रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर छत्रपती संभाजीनगर येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, दोन मुली, सून, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते अनंतराव व वसंतराव देवधर यांचे थोरले बंधू तर साई सेवक परिवारचे सदस्य स्व.अमोल देवधर यांचे ते वडील होत.



वैदुवाडी परिसरात मावा कारखान्यावर छापा टाकल्या नंतर आरोपी व मुद्देमालासह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

# सावेडीत मावा बनवणाऱ्या अड्ड्यावर पोलिसांचा छापा

नगर - सावेडी उपनगरातील वैदुवाडी परिसरात पत्र्याच्या खोलीत सुरू असलेल्या अवैध सुगंधी मावा बनवण्याच्या अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेने १८ ऑगस्ट रोजी सकाळी छापा टाकला. या कारवाईत मावा बनवण्याच्या मशीनसह १ लाख ४४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोघांविरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बबन रामा लोखंडे (वय ३२, रा. लोखंडी चाळ, वैदवाडी, सावेडी) आणि मेहराज (रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) या दोघांवर गुन्हा नोंदवला आहे. वैदुवाडी परिसरातील मातोश्री किराणा स्टोअर जवळील एका पत्र्याच्या खोलीत प्रतिबंधित सुगंधित मावा तयार केला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. मंगळवारी सकाळी सव्वा नऊच्या सुमारास पोलिसांनी तेथे छापा घातला.

या कारवाईत पोलिसांनी १० हजार रुपये किमतीचा ५ किलो तयार मावा, १४ हजार रुपयांची २० किलो सुगंधी तंबाखू मिश्रित चुरा सुपारी, १ लाख २० हजार रुपयांची मावा बनवणारी मोटारसह पिवळ्या रंगाची मशीन आणि सुमारे ५ हजार रिकाम्या प्लास्टिक पुड्या असा एकूण १ लाख ४४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

महाराष्ट्र शासनाने आरोग्यास घातक असलेल्या सुगंधित मावा व तंबाखू उत्पादनांवर बंदी घातली आहे. तरीही हा साठा विक्रीसाठी तयार केला जात होता. या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला असून महिला सहायक पोलीस निरीक्षक कल्पना चव्हाण पुढील तपास करत आहेत.

सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार शाहीद शेख, अरविंद भिंगारदिवे, योगेश भिंगारदिवे, संदिप पवार, विजय ठोंबरे, गणेश धोत्रे, सागर ससाणे व सोनल भागवत यांच्या पथकाने केली आहे.

# ब्रह्माकुमारीज द्वारा आयोजित विश्वविक्रमी अभियानांची महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांना दिली माहिती



ब्रह्माकुमारीज द्वारा आयोजित विश्वविक्रमी अभियानांची माहिती महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांना देताना बी के राजेश्वरी दीदी, बी के सुप्रभा दीदी, बी के डॉ दीपक हरके व मिस इंडिया बी के डॉ ईशा अगरवाल.

पुणे - प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या अहिल्यानगर सेवाकेंद्राच्या संचालीका बी के राजेश्वरी दीदी, बी के सुप्रभा दीदी, बी के डॉ दीपक हरके व मिस इंडिया बी के डॉ. ईशा अगरवाल यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची पुणे लोकभवन येथे भेट घेऊन संस्थेद्वारा आयोजित केलेल्या दोन विश्वविक्रमी अभियानांची माहिती दिली.

ब्रह्माकुमारी संस्थान ने भारतातील १० कोटी नागरिकांना व्यसनमुक्त करण्यासाठी '१० कोटी नशा मुक्ति प्रतिज्ञा महाअभियान' सुरू केले आहे. या देशव्यापी अभियानाद्वारे लोकांना व्यसनांपासून दूर राहण्याचा आणि निरोगी जीवन जगण्याचा संकल्प करण्यासाठी प्रेरित केले जाते. देशभरात १० कोटी लोकांना व्यसनमुक्त राहण्याची शपथ देणे. शाळा, महाविद्यालये, कार्यालयीन परिसर आणि राजयोग शिबिरांद्वारे जनजागृती.

मनाची ताकद वाढवण्यासाठी आणि व्यसनावर मात करण्यासाठी राजयोग ध्यानाचा मार्ग दाखवला जातो. अधिक माहितीसाठी आणि प्रतिज्ञा घेण्यासाठी तुम्ही ब्रह्माकुमारी नशा मुक्त भारत अभियान या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊ शकता. ब्रह्मकुमारी संस्थेच्या सोशल सर्व्हिस विंगच्या वतीने २१ ते २५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत 'युनिव्हर्सल ब्रदरहुड ब्लड डोनेशन ड्राइव्ह २०२६' (विश्वबंधुत्व रक्तदान महाअभियान) आयोजित केले आहे. राजयोगिनी दादी प्रकाशमणी यांच्या स्मृतीनिमित्त आणि जागतिक बंधुता दिनानिमित्त ही राष्ट्रीय स्तरावरील रक्तदान मोहीम राबवली जात आहे. याचा उद्देश आत्मिक व जागतिक बंधुत्वाची भावना जोपासत मानवासाठी निःस्वार्थ सेवा करणे आणि रक्ताची कमतरता दूर करणे. नोंदणी व शिबिर आयोजनासाठी ब्रह्मकुमारीज सोशल विंग या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्या. या अभियानांच्या यशस्वीतेसाठी महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी शुभेच्छा दिल्या.

# गृहिणी

## आरोग्य

### ऊर्जेने भरलेल्या दिवसासाठी

उर्जेने भरलेल्या दिवसाची सुरुवात करण्यासाठी आपल्या रोजच्या सवयींमध्ये काही साधे पण परिणामकारक बदल करणे खूप गरजेचे असते. सकाळी लवकर उठून दिवसाची सुरुवात सकारात्मकतेने केली, तर संपूर्ण दिवसभर टवटवीति आणि उत्साही वाटू शकते. सकाळी उठल्याबरोबर सगळ्यात आधी शरीराला हायड्रेट करणे सर्वात महत्त्वाचे आहे. रात्री झोपल्यानंतर शरीर डिहायड्रेट झालेले असते, त्यामुळे सकाळी १ ते २ ग्लास कोमट पाणी प्यायल्याने पचनक्रिया सुरळीत होते आणि शरीरातील विषारी घटक बाहेर पडण्यास मदत होते. यानंतर शरीराला ताजेतवाने करण्यासाठी काही वेळ नैसर्गिक सूर्यप्रकाशात घालवणे फायदेशीर ठरते, ज्यामुळे शरीराला व्हिटॅमिन डी मिळते आणि मूड सुधारतो. पाण्यानंतर शरीराला सक्रिय करण्यासाठी हलका व्यायाम, योगासने किंवा मोकळ्या हवेत चालणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे रक्ताभिसरण सुधारते आणि शरीरात ऊर्जा निर्माण करणारे हार्मोन्स सक्रिय होतात. व्यायाम झाल्यानंतर शरीराला दिवसभराची ताकद मिळण्यासाठी एक पौष्टिक आणि संतुलित नाश्ता करणे गरजेचे आहे, ज्यामध्ये प्रथिने आणि फायबरयुक्त पदार्थांचा समावेश असावा. केवळ सकाळची सुरुवातच नव्हे, तर संपूर्ण दिवसभर ऊर्जा टिकवून ठेवण्यासाठी दिवसभरात नियमित अंतर ठेवून पुरेसे पाणी पिणे आवश्यक आहे. तसेच, कामाच्या दरम्यान सतत स्क्रीन समोर बसण्याऐवजी थोड्या वेळाचा ब्रेक घेणे शरीराला आणि मनाला विश्रांती देतो. सकाळी उठल्यास मोबाईलपासून दूर राहणे आणि दिवसभरातील कामांचे आधीच नियोजन करणे यामुळे अनावश्यक मानसिक ताण टाळता येतो आणि मन शांत राहून दिवसभर कामात उत्साह टिकून राहतो.

## पाककला

### चिली पनीर

**साहित्य :** पनीर २५० ग्रॅम, शिमला मिरची १, कांदा १, हिरव्या मिरच्या ३-४, आलं-लसूण पेस्ट १ चमचा, कॉर्नफ्लॉवर ३ चमचे, मैदा १ चमचा, सोया सॉस, टोमॅटो सॉस, चिली सॉस, व्हिनेगर, काळी मिरी पूड, तेल, कांद्याची पात आणि मीठ.

**कृती :** पनीरला कॉर्नफ्लॉवर, मीठ व मिरी पूड लावून पॅनमध्ये शॅलो फ्राय करा. एका वाटीत सॉस एकत्र करा आणि दुसऱ्या वाटीत कॉर्नफ्लॉवर-पाण्याची पेस्ट बनवा. त्याच पॅनमध्ये आलं, लसूण, मिरच्या, कांदा आणि शिमला मिरची जोरात परतून घ्या. त्यात सॉसचे मिश्रण व कॉर्नफ्लॉवरची पेस्ट घाला, उकळी येऊ द्या. शेवटी फ्राय केलेले पनीर घालून मिक्स करा व वरून कांद्याची पात भुरभुरवून सर्व्ह करा.

## वास्तू

### गडद रंग वापरण्याचे दुष्परिणाम

* काळा आणि गडद करडा हे रंग अंधार, औदासिन्य आणि नकारात्मक ऊर्जेचे प्रतीक मानले जातात. वास्तुशास्त्रानुसार हे रंग घरामध्ये ताणतणाव, भीती आणि नैराश्य वाढवतात.
* हे रंग प्रकाश आणि सकारात्मक ऊर्जा शोषून घेतात, ज्यामुळे घरातील चैतन्य नष्ट होते आणि मन नेहमी अशांत राहते.
* घराच्या मुख्य भिंतींवर किंवा बैठकीच्या खोलीत (हॉलमध्ये) या रंगांचा अतिवापर कुटुंबातील सदस्यांमध्ये गैरसमज आणि वाद निर्माण करू शकतो. अतिशय गडद लाल, केशरी किंवा जांभळे रंग डोळ्यांना आणि मनाला त्रासदायक ठरतात.

## सौंदर्य

एक चमचा शुद्ध साजूक तूप आणि आधा चमचा मध एकत्र करून चेहऱ्यावर आणि ओठांवर हलक्या हाताने चोळा. वीस मिनिटे तसंच ठेवा आणि नंतर कोमट पाण्याचा वापर करून चेहरा धुवून टाका. यामुळे हिवाळ्यात किंवा उन्हाळ्यात होणारा कोरडेपणा नाहीसा होतो आणि त्वचेला मऊपणा मिळतो.

## सल्ला

ताकाची कढी किंवा कढी बनवताना ती उकळत असताना सतत ढवळत राहा, जेणेकरून ताक फुटणार नाही. कढीला खमंग फोडणी देण्यासाठी त्यात थोडा हिंग आणि कढीपत्ता आवर्जून वापरा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २० ऑगस्ट २०२६

**दुर्गाष्टमी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष, विशाखा ०९।०८, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. २१ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** कष्टाचे फळ उत्तम प्रकारे मिळेल. धनलाभाचे नवे मार्ग मोकळे होतील.

**वृषभ :** व्यवसायात मोठी प्रगती साध्य होईल. अपेक्षेपेक्षा जास्त यश प्राप्त होईल.

**मिथुन :** कौटुंबिक वातावरण अत्यंत आनंदी राहील. रखडलेले सर्व व्यवहार पूर्ण होतील.

**कर्क :** प्रत्येक क्षेत्रात भरघोस यश मिळेल. भाग्य पूर्णपणे साथ देईल.

**सिंह :** विरोधकांचा पराभव निश्चित होईल. समाजात मान-सन्मान वाढेल.

**कन्या :** मनासारख्या घटना घडत जातील. जुन्या समस्येचे समाधान होईल.

**तूळ :** जोडीदाराची उत्तम साथ लाभेल. मन दिवसभर प्रसन्न राहील.

**वृश्चिक :** जुनी कर्जे पूर्णपणे फिटतील. नोकरीत बढतीचे योग जुळून येतील.

**धनु :** विद्यार्थ्यांसाठी काळ सुवर्णकाळ ठरेल. अनपेक्षित धनलाभ संभवतो.

**मकर :** मालमत्तेचे व्यवहार अत्यंत लाभदायक ठरतील. घरात आनंदाची लहर राहील.

**कुंभ :** केलेला प्रवास सुखकर होईल. नव्या ओळखींमधून मोठा लाभ होईल.

**मीन :** आर्थिक स्थिती मजबूत होत जाईल. सुखाच्या साधनांमध्ये वाढ होईल.

## शब्दगंध क्र. ७४९८

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ■ | २ | | ३ | ■ | ४ | ५ |
| ६ | | | ■ | ७ | | | |
| | ■ | ८ | | | ■ | | ■ |
| ९ | | | ■ | | ■ | १० | ११ |
| | ■ | १२ | १३ | ■ | १४ | | |
| ■ | १५ | ■ | १६ | | ■ | १७ | |
| १८ | | १९ | | ■ | २० | | ■ |
| २१ | | | | ■ | २२ | | |

**आडवे शब्द :-** २) खात्री; भरवसा ४) फिर्याद; हक्क; शत्रुत्व ६) दम; जाण; शहाणपण; समजूत ७) लोकसभा किंवा राज्यसभेचा सभासद ८) एक मोठे चर्मवाद्य ९) रतीब; उकाडा १०) शत्रूच्या गोटातील माहिती गुप्तपणे आणणारा १२) बरोबर; सोबत; साथ १४) एक उद्गारवाचक शब्द १६) वाट; मार्ग; पथ १७) खूप; पुष्कळ; जास्त १८) न्यायाने किंवा अन्यायाने; अकारण किंवा सकारण २०) माला; हार; सर २१) फडशा; उत्पन्नाचा हिशोब; निकाल; शेवट २२) अयोध्येचे मूळ नाव

**उभे शब्द :-** १) स्माशानभूमी २) ओसाड जागेतील वास्तव्य ३) मराठी पुरुषाचे एक नाव ४) हिंदी चित्रपटांचे जनक ५) आघात; घाव; जखम ११) एक स्थितिस्थापक पदार्थ १३) विरोध; प्रतिकूल वर्तन; अडथळा १५) जिज्ञासू; शोधक १८) जिवंत राहण्यासाठीचा एक आवश्यक घटक १९) घाण पाणी वाहून जाण्याची वाट २०) हा प्राणी पाण्याच्या बाहेर जिवंत राहू शकत नाही

### शब्दगंध क्र. ७४९७ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पं | च | व | टी | ■ | भ | का | स |
| ग | र | ■ | का | त | रे | वे | ळ |
| त | ण | ■ | का | ■ | त | री | ■ |
| ■ | र | ■ | र | ब | का | ■ | वे |
| का | ज | वा | ■ | म | म | ता | ळू |
| ब | ■ | रं | ज | न | ■ | ले | ■ |
| का | ल | वा | ■ | ■ | न | वा | र |
| ब | ग | र | ■ | क | स | र | त |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** प्रत्येक नवीन दिवस ही नवीन सुरुवात करण्याची संधी असतो, तिचा सोन्यासारखा उपयोग करा.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### आकाशात चमकणाऱ्या ताऱ्यांचा आकार आपण काढतो तसा ताऱ्यासारखा असतो का?

लहानपणापासून आपण कागदावर किंवा चित्रांमध्ये ताऱ्यांचे चित्र काढताना नेहमी एका विशिष्ट आकाराचा वापर करतो. पण जर आपण प्रत्यक्षात अंतराळात जाऊन पाहिले, तर आपल्याला मोठा आश्चर्याचा धक्का बसेल. प्रत्यक्षात आकाशात चमकणारे तारे आपण कागदावर काढतो तसे अजिबात नसतात.

वैज्ञानिकदृष्ट्या सांगायचे तर, विश्वातील सर्व तारे हे पूर्णपणे गोलाकार असतात. आपल्या सूर्यमालेतील सूर्य देखील एक ताराच आहे आणि तो एका प्रचंड मोठ्या आणि चेंडूसारख्या गोल गोळ्याच्या रूपात आहे. ताऱ्यांचा हा गोल आकार त्यांच्या स्वतः च्या अफाट गुरुत्वाकर्षण शक्तीमुळे तयार होतो. ताऱ्यांच्या केंद्रातील प्रचंड गुरुत्वाकर्षण त्यांच्या वायू आणि उष्णतेला सर्व बाजूंनी धरून ठेवते, ज्यामुळे ते एक परिपूर्ण गोल आकार धारण करतात.

मग प्रश्न पडतो की, जर तारे गोल आहेत, तर ते आपल्याला रात्री लुकलुकताना आणि चमकताना का दिसतात? यामागचे मुख्य कारण आपली पृथ्वीची वातावरण रचना आणि आपले डोळे हे आहे. तारे आपल्यापासून अब्जावधी प्रकाशवर्षे दूर आहेत. तिथून निघणारा प्रकाश जेव्हा अंतराळातील मोकळा प्रवास करून आपल्या पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करतो, तेव्हा वातावरणातील विविध थर, हवा आणि धूलिकण यांमुळे त्या प्रकाशाचे अपवर्तन होते. हा प्रकाश हवेच्या थरांवरून थोडे इकडे-तिकडे हलतो. जेव्हा हा विखुरलेला प्रकाश आपल्या डोळ्यांपर्यंत पोहोचतो, तेव्हा आपल्या डोळ्यांच्या बाहुलीला तो एका बिंदूवर स्थिर न वाटता सतत थरथरणारा किंवा चमकणारा भासतो.

तसेच, ताऱ्यांच्या प्रकाशातील या सूक्ष्म विक्षेपणामुळे आपल्या डोळ्यांची रचना आणि मेंदूचा दृष्टिकोनाचा संच ताऱ्यांच्या सभोवताली प्रकाशाच्या रेषा किंवा किरण तयार झाल्याचा आभास निर्माण करतात. याच तांत्रिक आणि दृढ कारणामुळे आपल्याला तारे हे कागदावर काढतो त्या आकारासारखे भासतात.

थोडक्यात सांगायचे तर, कागदावरील ताऱ्यांचा आकार ही केवळ आपली एक सुंदर कल्पकता आहे, परंतु वास्तवात आकाशात चमकणारे तारे हे कोणत्याही ग्रहासारखे किंवा सूर्यासारखे प्रचंड आणि भव्य गोल गोळे असतात.

### मेहनत

एका गावात रमेश नावाचा तरुण राहत होता. त्याचे वडील अतिशय कष्टाळू होते, पण रमेशला वाटायचे की, कष्टाशिवाय शॉर्टकटने पटकन मोठे यश मिळवावे.

एक दिवस त्याला गावात एक अफवा समजली की, जंगलात एका दगडात जादूची सोन्याची अंगठी दडलेली आहे, जी शोधणाऱ्याला एका रात्रीत श्रीमंत बनवू शकते. रमेशने विचार केला, हीच संधी आहे, मला कष्ट करण्याची गरज नाही!

तो सलग महिनाभर दररोज सकाळी जंगलात जाऊन ती अंगठी शोधण्यासाठी अंगमेहनत करू लागला, माती उचलू लागला आणि जंगलात खूप फिरला. पण महिनाभर शोधूनही त्याला अंगठी काही सापडली नाही. शेवटी कंटाळून त्याने एका वृद्ध आजोबांना विचारले, मला ती अंगठी कुठेच मिळाली नाही, माझे सर्व कष्ट वाया गेले.


आजोबा हसून म्हणाले, बाळा, जंगलात कोणतीही जादूची अंगठी नाही. ती अफवा मीच पसरवली होती जेणेकरून तुझ्याकडून कष्ट करून घेता यावेत.

रमेश संतापला, पण आजोबा त्याला म्हणाले, तुझे कष्ट वाया गेलेले नाहीत! महिनाभरापूर्वी तू खूप आळशी होतास, पण या बहाण्याने तू दररोज पहाटे उठून न थकता फिरलास आणि कष्टाची सवय लावून घेतलीस. आज तुझ्या अंगी जी जिद्द आणि मेहनतीची ताकद निर्माण झाली आहे, तीच तुझी खरी 'जादूची अंगठी' आहे!

रमेशला चूक समजली. त्याने आळस सोडला आणि आपल्या कामात मन लावून मेहनत केली. काही वर्षांतच तो आपल्या कष्टाच्या बळावर एक यशस्वी माणूस बनला.

बोध : आयुष्यात शॉर्टकटने कधीही यश मिळत नाही. मेहनत आणि चिकाटी हीच खरी यशाची जादू आहे.

## आत्मशक्ति



### आनंद

अध्यात्माचे आणखी एक वैशिष्ट्य आहे ते म्हणजे नित्य अथांग असा दिव्य आनंद. आनंदी आत्मा नेहमीच आनंदात असतो. तो रात्रंदिवस आत्मानंदामध्ये मग्न असतो. ह्या आनंदाची अथांगता आपणास समजणारच नाही. एका उदाहरणावरून ते समजून घेणे शक्य होईल. आपल्या जीवनात घडलेल्या सर्वोत्तम अशा आनंददायी प्रसंगाची आठवण करा व अशा त्या आनंदाला हजाराने गुणा! आमच्या आयुष्यात आनंदाचे अनेक प्रसंग येतात. उदा. आमचा विवाह, अपत्यप्राप्ती, आम्हाला मिळालेली बढती, एखादी स्पर्धा जिंकणे, एखाद्याचा जीव वाचवणे किंवा जीवनाची ध्येयप्राप्ती. ह्या अशा आनंदावरून त्या आनंदाची कल्पना करणे कठीणच आहे. पण त्यावरूनही काही अंदाज येऊ शकतो. जर आम्ही आपल्या आत्म्याला ओळखले तर कधीही नाश न पावणाऱ्या आनंदाची धुंदी आम्ही कायमस्वरूपात मिळवू शकतो.

तसेच आयुष्यात आम्हाला दुःख-वेदना स्पर्श करू शकणार नाहीत. व्यथा आणि दुःखापासून मुक्तिसंत व महात्म्यांनी परमेश्वराला प्रेमाचा सागर म्हटले आहे. तो व्याधी आणि दुःखापासून मुक्त आहे. परमेश्वराचे स्वरूप असल्याने आत्मा सुद्धा प्रेम आणि आनंदाने भरलेला आहे. आपल्या मूळरूपात आत्मा नेहमी आनंदात आणि प्रेमात मग्न असतो. मूळस्वरूपात तो घृणा, मत्सर, वेदना आणि कष्टापासून मुक्त असतो. आत्म्यामध्ये असे काही नसते की, त्यायोगे त्याला दुःखी व्हावे लागेल. मनुष्ययोनीत अशा परिस्थितीचा अंदाज घेणे कठीणच पडते. कारण आम्ही नेहमीच दुःख, वेदना, मत्सर, घृणा आणि भेदभावाने घेरलेले असतो. आम्ही आमच्या आयुष्याकडे पाहिले तर दिसेल की आम्हाला सुखापेक्षा दुःखाचेच प्रसंग जास्त येतात.

सद्गुरु संत दर्शनसिंहजी महाराज आपल्या एका शेरमध्ये सांगतात,ह को खुशी मिली भी अगर आरजी मिली। लेकिन जो गम मिले वो गमे जाविदा मिले ।।आमच्या जीवनात आनंदाचे प्रसंग काही क्षणापुरते येतात. परंतु जेव्हा दुःख, वेदना होतात तेव्हा असे वाटू लागते की त्या वेदना अपार, केव्हाही न संपणाऱ्या अशा आहेत. मग असा प्रश्न उभा राहतो की, जर आमचा आत्मा आनंदाने भरलेला आहे तर आम्हाला दुःख व वेदना का होतात ? गुरुनानकदेवजी यांनी माणसाच्या या अवस्थेबद्दल

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### ग्रहणक्षमता

हे अन्न देवाचं नाव घेत बनवलं आणि आधी त्याला नैवेद्य दाखवला तर त्याचा प्रसाद होतो. आता कल्पना करा, पहिला पर्याय हा की बाळाचं संगोपन रोज प्रसादाने करायचं किंवा दुसरा पर्याय, त्याला मृत ऊर्जा द्यायची. ह्या दोन्हीमध्ये तुलना होऊच शकत नाही. बाळाचं शरीर तयार होत असताना त्याचं नशीब लिहिण्याची शक्ती पालकांकडे असते हे लक्षात ठेवलं पाहिजे.

सुरेश ओबेरॉय : आता पेंट, ब्रश आणि कॅनव्हास आपल्या हातात आहेत.

शिवानीदीदी : बरोबर, या काळात पालक ज्या रंगांचा वापर करतील त्याचा खोलवर परिणाम होईल. म्हणूनच त्यांनी सात्त्विक अन्नाचं सेवन करायला हवं आणि इंटरनेट, चित्रपट किंवा बातम्या कोणत्याही माध्यमातून नकारात्मक गोष्टी ऐकणं, वाचणं आणि पाहणं टाळायला पाहिजे. त्यांनी अशा कोणत्याही गोष्टींचं सेवन करायला नको ज्याचा फक्त त्यांच्यावरच नाही तर बाळावरही परिणाम होईल. कारण आईच्या उदरात बाळाची ग्रहणक्षमता सर्वात जास्त असते. ते आत्मचेतनेच्या अवस्थेत असतं. त्यामुळे पालकांनी फक्त निर्मळ, शक्तिशाली आणि प्रबोधनपर मजकूर वाचला पाहिजे. जर ते संगीत ऐकत असतील तर त्यांनी शांत आणि आल्हादायक संगीत ऐकायला हवं. खूप कर्कश आणि अस्वस्थ करणारं काही ऐकायला नको आणि खूप गडबड गोंधळ असणाऱ्या ठिकाणी जायला नको. हे सगळे प्रयत्न आत्म्याची जोपासना करतील. म्हणूनच आईवडिलांनी त्यांच्या अन्नाची आणि मनाची काळजी घ्यायला हवी.तिसरा घटक म्हणजे पैसा. पालकांनी कोणाचीही फसवणूक करून थोडाही पैसा घरात आणू नये. अशा पैशाने कधीच मुलांसाठी अन्न खरेदी करू नये, कारण त्या पैशाबरोबर त्याचं दुःख आणि दुर्दैवही आपलं जातं. जर आपण व्यवसायात कुणाला फसवत असू किंवा कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांवर ओरडत असू किंवा वर्चस्व गाजवत असू तर ते आपल्याबद्दल नकारात्मक विचार निर्माण करतील आणि पैशांबरोबर आपण नकारात्मक ऊर्जाही मिळवू. ही ऊर्जा बाळावर परिणाम करते. पालकांचा पैसा, अन्न, मन आणि शरीर जसं असेल तसं बाळाचं व्यक्तिमत्व असेल.

सुरेश ओबेरॉय : जसा पैसा, तसं अन्न आणि जसं अन्न तसं मन. शिवानीदीदी : आणि जसं मन तसं शरीर. या सर्व चार ऊर्जा पालकांच्या हातात आहेत. म्हणूनच या महत्वाच्या काळात पालकांनी सबबी सांगू नयेत. खासकरून आईने कुटुंबातील छोट्या छोट्या गोष्टींत पडू नये. तिच्या बाळाची तब्येत ही तिच्यासाठी प्राधान्याची बाब आहे म्हणून तिने कोणाशीही वाद घालू नयेत.भावी आईला सहज वाटावं, तिने तणावरहित राहावं म्हणून तिला शारीरिक आणि भावनिक विश्रांती देणं ही संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी आहे. भावनिक विश्रांती म्हणजे तिचं मन शांत आणि स्थिर राहावं. (क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको नवऱ्याला म्हणाली : तुम्ही मला एवढं प्रेम करता, मग माझं नाव तुमच्या मोबाईलच्या पासवर्डला का ठेवत नाही?

नवरा शांतपणे म्हणाला : अगं वेडे, पासवर्ड नेहमी 'स्ट्रॉन्ग' (अजिबात न समजणारा) असावा लागतो!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारताचे राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्' कोणत्या ग्रंथातून घेण्यात आले आहे?

– बंकीमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या 'आनंदमठ' या कादंबरीतून.

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद - आरोग्य संवर्धन

### तांदूळ

आधुनिक शास्त्रानुसार : जवामध्ये कॅल्शिअम, लोह, फॉस्फरस, 'क' जीवनसत्त्व व थोड्या प्रमाणात 'बी' जीवनसत्त्व, तसेच प्रथिने, तंतुमय व पिष्टमय पदार्थ, स्निग्धता व आर्द्रता असते. जवामध्ये प्रथिने व 'बी' जीवनसत्त्व विपुल प्रमाणात असून, त्यातील प्रथिने हे मका, घेवडा यापेक्षाही उत्तम दर्जाचे असते. जवाला अंकुर फुटल्यानंतर त्याला माल्ट असे म्हणतात. मोड आणलेले जव वाळवून तयार केलेले जवाचे पीठ हे अधिक पौष्टिक असते. उपयोग : १) जवाचा सहसा उपयोग मुख्यतः सूप बनविण्यासाठी करावा. कारण त्यामध्ये ग्लुटेन घटक फारच कमी प्रमाणात असल्यामुळे त्याची भाकरी अथवा पोळी चिकटपणा कमी असल्यामुळे बनत नाही. २) लहान मुलांची वाढ झपाट्याने होण्यासाठी त्यांच्या आहारामध्ये माल्टचा उपयोग करावा. ३) गर्भवती स्त्रियांच्या शरीराचे पोषण होण्यासाठी, तसेच गर्भस्थ बाळ सुदृढ होण्यासाठी जवाचे सूप आठवड्यातून दोन वेळा घ्यावे. ४) जवापासून तयार झालेले पर्ल बार्ली हे धान्य आजारी व्यक्तींसाठी व अपंगांसाठी उपयुक्त असे धान्य आहे. ५) भूक न लागणे, अशक्तपणा जाणवणे, अपचन या विकारांमध्ये जव उकडून ते पाणी सतत थोडे थोडे प्यावे. ६) आम्लपित्त, पोटामध्ये दाह जाणवणे, खाल्लेले अन्न व्यवस्थित न पचणे, शौचास साफ न होणे अशा विकारांवर जव रात्रभर पाण्यात भिजत ठेवावेत व सकाळी उठल्यावर ते पाणी उकळून निम्मे झाल्यावर कोमट असतानाच थोडे थोडे दिवसभर प्यावे. या पाण्याने आतड्यामधील जळजळ थांबून शरीरामध्ये थंडावा निर्माण होतो. जवामधून निघणाऱ्या एका तेलकट पदार्थामुळे आतड्यातील श्लेष्मल त्वचेला संरक्षण मिळते. त्यामुळे दाह होण्यापासून त्वरित आराम मिळतो. अशाप्रकारे पचनसंस्थेला आराम मिळून अन्नपचन व्यवस्थित होते. फक्त हा प्रयोग करताना त्या दिवशी इतर कोणतेही अन्नपदार्थ खाऊ नयेत.

७) जवाची पेज ताक व लिंबू घालून प्यायल्याने लघवीची जळजळ थांबते. जव थंड व मूत्रल असल्याने मूत्रपिंड व मूत्रवाहिनी यांच्या कोणत्याही तक्रारीवर जवाचा हमखास उपयोग होतो. ८) खूप ताप येऊन शरीराचा दाह होत असेल, तर जवाचे सूप थोड्या थोड्या अंतराने प्याल्यास दाह व ताप कमी होतो.सावधानता :जवापासून माल्ट तयार करून तसेच इतर द्रव्यांची संधानप्रक्रिया करून त्यापासून बिअर, व्हिस्की तयार करतात. जगामध्ये सर्वात जास्त बिअर जवापासूनच बनविली जाते. म्हणूनच आयुर्वेदामध्ये काही विशिष्ट व्याधींमध्ये (कास, कृशता, अशक्तपणा, जीर्ण खोकला, क्षयरोग, भूक कमी लागणे) अल्प प्रमाणात जवापासून बनविलेले नैसर्गिक मद्य पिण्यास सांगितलेले आहे. त्यामध्ये असणाऱ्या औषधी गुणधर्मामुळे शरीराची पचनशक्ती वाढून वरील आजार बरे होतात. परंतु हे मद्यप्राशन अगदी थोड्या प्रमाणात औषधी स्वरूपात योग्य असते. याची मात्रा जर जास्त प्रमाणात घेतली, तर वरील आजार बरे होण्याऐवजी शरीराची हानी झालेली दिसून येते. **(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



सावेडी परिसरातील मौजे डोकेनगर येथील सौ. लक्ष्मीबाई शांताराम डोके विद्या मंदिर येथे स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला.

# विद्यार्थ्यांनी देश हित पाहून स्वतःचा विकास साधावा

**बापूसाहेब डोके यांचे प्रतिपादन; सौ लक्ष्मीबाई शांताराम डोके विद्या मंदिर येथे स्वातंत्र्य दिन साजरा**

नगर – बालपणापासून विद्यार्थ्यांवर योग्य संस्कार केले पाहिजे देश हिताला सर्वप्रथम स्थान देऊन स्वतःचा विकास केला पाहिजे. विद्यार्थी केंद्री शिक्षण पद्धती २०२० मध्ये आल्याने विद्यार्थ्यांना सर्वसमावेशक शिक्षणाची संधी प्राप्त झाली आहे. विविध स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अनेकवीध मानसिक अंगांना स्पर्श होतो, तसेच विविध खेळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास होतो. जीवन जगण्यासाठी कला सर्वात महत्त्वाची आहे त्यामुळे कलेचे ही शिक्षण विद्यार्थ्यांनी घेतले पाहिजे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांचे निरीक्षण करून त्या पद्धतीने विद्यार्थ्यांना अध्यापन करावे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी शरदचंद्र पवारचे प्रदेश चिटणीस व संस्था अध्यक्ष बापूसाहेब डोके यांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले. सावेडी परिसरातील मौजे डोकेनगर येथील सौ. लक्ष्मीबाई शांताराम डोके विद्या मंदिर येथे स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. यावेळी संस्था अध्यक्ष तथा राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी श. प. चे प्रदेश चिटणीस बापूसाहेब डोके यांच्या हस्ते ध्वजारोहण कार्यक्रम पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी वरील प्रतिपादन केले.

प्रास्ताविक मुख्या. श्रीम रिबेका क्षेत्रे यांनी केले सूत्रसंचालन मंदाकिनी पांडुळे यांनी केले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून संस्था सचिव सौ आशादेवी डोके, महेश डोके माजी जि.प सदस्य बीड सौ मीनाक्षीताई पांडुळे, माजी मुख्याध्यापक बिडवे सर, सोमनाथ शेलार, सुप्रिया दळवी शेलार, श्री.बांगर यांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. संत नरहरी मल्टीस्टेट यांच्याकडून विद्यालयातील विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आला.

पतसंस्थेचे मॅनेजर श्री. केरकळ, जयश्री वीर, रोहिणी गिरजे, ऋतुराज बोकन आदि उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्रीमती मंजू नवगिरे, संज्योत बर्वे, आशा धामणे, सुजाता कर्डिले, श्रीमती पवार यांनी संचालन केले, भरत जगदाळे, राऊत मॅडम, वाळके मॅडम उपस्थित होते. आभार श्री साई विद्यालयाचे मुख्याध्यापक संभाजी पवार यांनी मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## दुसऱ्याचे दुःखद जाणले पाहिजे




जैन मुनी देवर्दिगणी यांनी आचाराग नावाचा संग्रहग्रंथ तयार केला आहे. त्यात एक श्लोक आहे.

सव्वे पाणा पियाउया सुहसाया दुःखपडिकुला

अप्पिवयदा पियजीविणो जीविउ कामा।

प्रत्येकाला आपले प्राण प्रिय आहेत. प्रत्येकालाच सुख हवे असते. दुःख कुणालाच नको वाटते. कुणीतरी आपला घात करील, असे कधीही न घडावे. मला जगायचे आहे. मृत्यू नको.

पण हे ओरडून कशाला सांगायचे जगाला ? माणसा, तूच उठ आणि लाग ना ते सगळे साधायला. तुझ्या हाती आहे हे सगळे विचार आणि व्यवहार याचा घे आधार. नाहीस तू या जगात निराधार सगळ्या प्राण्यांना प्राण प्रिय आहेत. तर केवळ स्वतःचे प्राण जपून का तू सुखाने जगणार आहेस? प्रत्येकाने दुसऱ्याचे प्राण जपावेत, मग सगळ्यांचे प्राण जपले जातील.

एका आळीत प्रत्येकाकडे चोरी व्हायची सगळे चिंतित व्हायचे. आपल्या खोलीत चोर कसा शिरतो. ते कुणाला कळेच ना. चोर पकडला जाईना. कुणालाही जीवन सुरक्षित वाटेना. प्रत्येक जण स्वतःला जयापचा आणि चोराची शिकार व्हायचा.

पण एकदा चोर सापडला. दुसऱ्यांदाही पकडला गेला. तिसऱ्यांदा तर त्याला लोकांनी बदडला. सगळ्यांचे जीवन सुरक्षित झाले. हे कसे घडले ? दार तोडायला चोर येताच तो शेजाऱ्याला दिसला. तो ओरडला. आतला जागा झाला. दोघांनी मिळून चोर पकडला. असेच दुसऱ्यांदा दुसऱ्याकडे घडले. तसेच तिसऱ्या वेळीही शेजाऱ्यानेच शेजाऱ्याला जपले. चोराला ठोकले. हे दुसऱ्याचे दुःख प्रत्येकाने जाणणे होय. त्यामुळेच प्रत्येकाची होते सुखसोय आणि दुःखाचा होतो नाश. मुक्ताबाई म्हणतात,

सर्व सर्व सुख अहं तेचि दुःख ।
मोह ममता विष त्यजियेले ।।
साधकबाधक करुनि विवेक। मति, मार्ग, तर्क शोधियेला ।।

सगळ्यांचा विचार हाच सुखाचा संसार, केवळ मी करतो माझा विचार, तो तर दुःखाचाच भार. मी मलाच जपणे, हे मोहाचे दुखणे. माझा माझ्यावरच जीव, हे तर विकत घेतलेले विष. हे सोडले पाहिजे. साधकबाधक, विचार केला पाहिजे. त्यासाठी बुद्धी आणि तर्क वापरला पाहिजे. मग मार्ग आपोआपच सापडेल.

दुःख निमूटपणे सोसायचे असते. सांगायचे नसते. सागितल्याने आपलेच हसे होते. दुसरा म्हणतो, हे काय नव्याने सांगणे ? दुःख तर प्रत्येकाच्याचं भाळी असते. दुःखाला जात नसते. दुःखाला धर्म नसतो, रंग नसतो, देश नसतो, दुःखाजवळ स्त्री पुरुषचा श्रीमंत गरीब असा भेदही नसतो. पण लक्षात ठेवा. दुःख बर्फासारखे असते. बोचरे, बधिर करणारे. पण लवकरच वितळणारे देखील जरा सोशिकपणा असावा. थोडा धीर धरावा दुसऱ्यांच्याही दुःखाचा विचार करावा.

सुख तर जवळच आहे तुझ्या, प्रचंड प्रमाणात पण केवळ दुःखाचाच विचार करण्याची प्रवृत्ती तुझी, मगं सुख भावायला संधीच मिळणार कशी?

**– किशोर गांधी**

# जलसंधारण दिनानिमित्त आकाशवाणीवर पांडुरंग गायसमुद्रे यांची विशेष मुलाखत



जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे यांची विशेष मुलाखत घेताना माहिती अधिकारी डॉ. मीरा ढास.

नगर – माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जलसंधारण विषयक दूरदृष्टीला अभिवादन करण्यासाठी या वर्षा पासून त्यांच्या जयंतीदिनी, २१ ऑगस्ट हा 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्यातील जलसंधारणाच्या कामाची आणि उपक्रमांची माहिती देणारी जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे यांची विशेष मुलाखत आकाशवाणीच्या अहिल्यानगर केंद्रावरून 'आमचं शेत, आपला परिसर' या कार्यक्रमात १९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७:३० वाजता प्रसारित करण्यात येणार आहे.

ही मुलाखत आकाशवाणी अहिल्यानगर केंद्र १००.१ मेगा हर्ट्झ एफ एम चॅनल आणि तसेच "News On AIR' मोबाईल वर मुलाखतीचे प्रसारण करण्यात येणार आहे. वेव्हज या ओटीटी प्लॅटफॉर्म वरती आपल्याला कुठेही ऐकता येऊ शकते. ही मुलाखत माहिती अधिकारी डॉ. मीरा ढास यांनी घेतली आहे.

# शालार्थ ई-केवायसीसाठी मुदतवाढ द्या; शिक्षक भारतीची मागणी

**तांत्रिक अडचणी दूर करून शिक्षकांचे वेतन वेळेवर करा : सुनील गाडगे**

नगर – राज्यातील शिक्षकांना शालार्थ वेतन प्रणालीद्वारे वेतन मिळण्यासाठी ई-केवायसी पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करताना शिक्षकांना विविध तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ द्यावी आणि तांत्रिक अडचणी तातडीने दूर कराव्यात, अशी मागणी शिक्षक भारती संघटनेच्या वतीने महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण आयुक्तांकडे करण्यात आली अशी माहिती शिक्षक नेते तथा शिक्षक भारतीचे राज्य सचिव सुनील गाडगे यांनी दिली.

शालार्थ प्रणालीवर ई-केवायसी करताना सर्व्हरची अडचण, माहिती अपडेट न होणे, आधार व इतर कागदपत्रांशी संबंधित अडथळे यामुळे अनेक शिक्षकांची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. त्यामुळे तांत्रिक अडचणींमुळे कोणत्याही शिक्षकाचे वेतन रखडू नये, यासाठी शिक्षण विभागाने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी संघटनेने केली आहे.

शिक्षक नेते तथा शिक्षक भारतीचे राज्य सचिव सुनील गाडगे म्हणाले, शिक्षकांची कोणतीही चूक नसताना तांत्रिक अडचणींमुळे त्यांचे वेतन थांबणे योग्य नाही. ई-केवायसी प्रक्रिया सुलभ करून शिक्षकांना ती पूर्ण करण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा. शिक्षण विभागाने तांत्रिक अडचणींचे तातडीने निराकरण करून ई-केवायसीची मुदत वाढवावी.

ते पुढे म्हणाले, शिक्षकांना अध्यापनाच्या कामासोबत विविध ऑनलाइन प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. त्यामुळे संबंधित प्रणाली सुरळीत असणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. ई-केवायसीच्या प्रक्रियेमुळे शिक्षकांना अनावश्यक मानसिक त्रास होऊ नये आणि त्यांच्या वेतनावर कोणताही परिणाम होऊ नये, याची दक्षता शिक्षण विभागाने घ्यावी.या मागणीसाठी शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, जिल्हा सचिव विजय कराळे, जिल्हा कार्याध्यक्ष संजय पवार, पुणे विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, कार्यवाह संजय भुसारी यांच्यासह कैलास जाधव, योगेश हराळे, नवनाथ घोरपडे, सचिन शेलार, सुदाम दिघे, मोहंमद समी शेख, रामराव काळे, संभाजी पवार, हनुमंत रायकर, सिकंदर शेख, संतोष देशमुख, किसन सोनवणे, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, विभावरी रोकडे, मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुंज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर तसेच विनाअनुदानित राज्याध्यक्ष रूपाली कुरूमकर आदी उपस्थित होते.

ई-केवायसीसाठी मुदतवाढ देऊन तांत्रिक अडचणी तातडीने सोडवाव्यात आणि शिक्षकांचे वेतन वेळेवर मिळेल, याची व्यवस्था करावी, अशी मागणी शिक्षक भारती संघटनेने केली आहे.

# आडसूळ एज्युकेशनल कॅम्पसचे चेअरमन डॉ. अनिरुद्ध आडसूळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करीत संस्थेत ८० वा स्वातंत्र्यदिन साजरा



आडसूळ एज्युकेशनल कॅम्पसमध्ये संस्थेचे चेअरमन डॉ. अनिरुद्ध आडसूळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य आदी.

नगर – अहिल्यानगर तालुक्यातील चास येथील आडसूळ एज्युकेशनल कॅम्पस येथे देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे चेअरमन डॉ. अनिरुद्ध आडसूळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात देत विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून स्वातंत्र्यदिनाचा उत्साह द्विगुणित केला.

ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. अनिरुद्ध आडसूळ यांनी बदलत्या काळातील शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. आजच्या विद्यार्थ्यांनी केवळ नोकरी मिळविण्याचे ध्येय न ठेवता स्वतःचे ज्ञान, कौशल्य आणि कल्पकतेच्या जोरावर नोकरी निर्माण करणारे उद्योजक बनले पाहिजे, असे आवाहन केले. ते पुढे म्हणाले, भारताची युवा शक्ती ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांनी कौशल्यविकास, तंत्रज्ञान, नवकल्पना आणि उद्योजकतेकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी तरुणांनी स्वतःच्या पायावर उभे राहून इतरांनाही रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. नोकरी करणारा होण्यापेक्षा नोकरी देणारा होण्याचा संकल्प प्रत्येक विद्यार्थ्याने केला पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

स्वातंत्र्यदिन हा केवळ ध्वजारोहणाचा दिवस नसून देशाप्रती आपली जबाबदारी आणि कर्तव्य यांची जाणीव करून देणारा दिवस आहे. देशाच्या प्रगतीमध्ये युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणा, शिस्त, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रप्रेम या मूल्यांना आपल्या जीवनात स्थान द्यावे, असेही डॉ. आडसूळ यांनी नमूद केले.

कार्यक्रमादरम्यान आडसूळ एज्युकेशनल कॅम्पस परिसरात तिरंगी सजावट करण्यात आली होती. विद्यार्थ्यांमध्ये स्वातंत्र्यदिनाचा उत्साह आणि देशभक्तीची भावना दिसून आली. यावेळी कार्यक्रमास संस्थेचे माणिक आडसूळ, सचिव लीना आडसूळ, संचालक कृष्णा आडसूळ, खजिनदार परमेश्वर आडसूळ, सदस्या डॉ. कल्पना आडसूळ, रत्ना आडसूळ आणि पायल आडसूळ, प्राचार्य व संचालक डॉ. प्रदीप एम. पाटील, डॉ. संभाजी पठारे, डॉ. रमेश गडाख, डॉ. धनंजय लांडगे, डॉ. संदेश वायाळ, डॉ. प्रदीप पंडित, डॉ. रियाज बेग यांच्यासह महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

# निवड झालेल्या प्रशिक्षणार्थी महिलांसाठी २० ऑगस्टला विशेष कार्यशाळेचे आयोजन



विनायक देशमुख

नगर – कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत प्रशिक्षणासाठी अहिल्यानगर शहरातील निवड झालेल्या महिलांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायकराव देशमुख यांनी दिली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षाच्या निमित्ताने राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात महिला सक्षमीकरण अभियान हाती घेण्यात आले आहे. त्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या तसेच गरजु व एकल महिलांसाठी शासनाच्या विविध विभागांमार्फत रोजगाराभिमुख प्रशिक्षण दिले जाते. तसेच महिलांना शासनाच्या योजनांची माहिती देऊन स्वयंरोजगाराबाबत जागरुकता निर्माण केली जात आहे.

अहिल्यानगर येथील इन्स्टिट्यूट फॉर स्टडीज इन डिझाईन अँण्ड टेक्नॉलॉजी (आय. एस.डी.टी.) व स्किल क्राफ्ट सेंटर यांच्या सहकार्याने २० ऑगस्ट रोजी दुपारी २.३० वाजता आयएसडीटी सभागृह, लाल टाकी, अहिल्यानगर येथे आयोजित या शिबिरात कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त योगेश उगले, जिल्हा उद्योग केंद्राचे उद्योग अधिकारी अशोक बेनके, उमेद अभियानाचे जिल्हा व्यवस्थापक सोमनाथ जगताप, बाल विकास प्रकल्प अधिकारी महादेव जायभाय, सहाय्यक उद्योग अधिकारी शकील हवालदार हे उपस्थित राहून शासनाच्या योजनांची माहिती देणार आहेत. याप्रसंगी आयएसडीटीच्या संचालिका पूजा देशमुख व स्किल क्राफ्ट सेंटरच्या संचालिका पूनम खाडे या उपस्थित राहणार आहेत.

आगामी वर्षभरात अहिल्यानगर शहरातील ५०० महिलांना फॅशन डिझाईन, हँड एम्ब्रॉयडरी, मशीन एम्ब्रॉयडरी, आरी वर्क, संगणक प्रशिक्षण अशा विविध विषयांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. पहिल्या टप्प्यात दिडशे महिलांची निवड करण्यात आली असून या महिलांसाठी हे मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले आहे. प्रशिक्षणात व मार्गदर्शन शिबिरात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या महिलांनी (०२४१-२४३००२३) येथे संपर्क साधावा, असे आवाहन देशमुख यांनी केले आहे.



कल्याण रोडवरील अभियंता भवन येथे क्वांटम कॉम्प्युटिंग संगणकीय तंत्रज्ञानाची पुढील पिढी या विषयावर प्रा. पूजा वैकर यांनी व्याख्यान दिले. यावेळी अभियंते, प्राध्यापक, तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यक्ती उपस्थित होते. (छाया – विजय मते)

# क्वांटम कॉम्पुटिंग संगणकीय तंत्रज्ञानाची पुढील पिढी या विषयावर तांत्रिक व्याख्यान

नगर – नगर– कल्याण रोडवरील अभियंता भवन येथे अहिल्यानगर द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स लोकल सेंटरच्या वतीने क्वांटम कॉम्पुटिंग संगणकाच्या पुढील पिढीला समजून घेणे या विषयावर डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथील कॉम्प्युटर सायन्स अँड डिझाईन इंजिनिअरिंग विभागाच्या सहाय्यक प्रा. पूजा वैकर यांनी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

आपल्या व्याख्यानातून त्यांनी क्वांटम कम्प्युटिंगची मूलभूत संकल्पना, क्वांटम बिट (क्विबिट), अध्यारोपण स्थिती, क्वांटम परस्परसंबंधी जोडणी, पारंपरिक संगणक आणि क्वांटम संगणक यांमधील फरक सांगून भविष्यातील संगणकीय तंत्रज्ञानातील क्वांटम कम्प्युटिंगचे महत्त्व याबाबत सविस्तर माहिती दिली. क्वांटम कम्प्युटिंगमुळे संगणकीय क्षेत्रात होणारे संभाव्य बदल आणि त्याच्या विविध क्षेत्रांतील उपयोगांवरही त्यांनी प्रकाश टाकला.

कार्यक्रमास द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स लोकल सेंटरचे मानद सचिव डॉ. दीपक विधाते, अध्यक्ष भारतभूषण भागवत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच सौरभ वैकर, इंजिनिअर आर. पी. वायकर, इंजिनिअर हरीश ठिगळे, इंजिनिअर अरविंद पारगावकर, इंजिनिअर मनोहर आणेकर, इंजिनिअर प्रदीप तांदळे यांच्यासह अभियंते, प्राध्यापक, विद्यार्थी आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग आणि आधुनिक संगणकीय तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर क्वांटम कॉम्प्युटिंग सारख्या अत्याधुनिक विषयावर आयोजित करण्यात आलेले हे व्याख्यान विद्यार्थी व तंत्रज्ञान क्षेत्रातील अभ्यासकांना अत्यंत उपयुक्त ठरले.

# निमगाव वाघात श्री संत बाळू मामांच्या मूर्तीची उत्साहात प्राणप्रतिष्ठापना

**बिरोबा मंदिरात विधीवत पूजा, होम-हवन व अभिषेक; भंडाऱ्याची उधळण**



संत बाळू मामांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापनाप्रसंगी होम-हवन करण्यात आले.

नगर – नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे श्री संत बाळू मामांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना बिरोबा मंदिरात मोठ्या भक्तिभावाने व उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. यानिमित्त मंदिर परिसरात विविध धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले होते. विधीवत पूजा, होम-हवन व अभिषेकाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

देवस्थानचे भगत नामदेव भुसारे व पुरोहित नारायण देवा औटी यांच्या मार्गदर्शनाखाली प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यात धार्मिक विधी पार पडले. मंत्रोच्चाराच्या गजरात श्री संत बाळू मामांच्या मूर्तीची पूजा करण्यात आली. होम-हवनानंतर मूर्तीचा अभिषेक करण्यात आला. यावेळी ग्रामस्थ व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन घेतले.

या मूर्तीची भेट अनिरुद्ध अडसुळ परिवाराच्या वतीने देण्यात आली. मुर्तिकार भगवान जगताप यांनी आकर्षक व देखणी श्री संत बाळू मामांची मूर्ती साकारली आहे. प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त उत्सवमूर्तीसह गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक ढोलपथकाच्या तालावर निघालेल्या या मिरवणुकीत भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. मिरवणुकीदरम्यान भाविकांकडून भंडाऱ्याची उधळण करण्यात आली. संत बाळू मामाच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. महिला भाविकांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेत धार्मिक उत्सवाचा आनंद घेतला.

यानिमित्त प्रा. सुरेश महाराज खेत्रे यांच्या कथेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यांनी आपल्या ओघवत्या वाणीतून संत बाळू महाराजांचे जीवनचरित्र, त्यांचे कार्य, भक्ती व समाजाला दिलेला संदेश याबाबत उपस्थित भाविकांना मार्गदर्शन केले. त्यांच्या कथेला भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या सोहळ्यास डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्राम पंचायत सदस्य नाना डोंगरे, बाबा जाधव, पांडूरंग गुंजाळ, गोकुळ जाधव, साहेबराव बोडखे, अतुल फलके, सागर कापसे, अरुण कापसे, जालिंदर जाधव, बाबा पुंड, संजय कापसे, शिवाजी पुंड, नारायण शिंदे, रामदास वाखारे, ठकाराम शिंदे, सुनील जाधव, गुलाब जाधव, युवराज भुसारे, निलेश भुसारे उपस्थित होते. भाविकांनी संत बाळू मामांच्या मूर्तीचे दर्शन घेतले. अखेर भंडाऱ्याने या धार्मिक सोहळ्याची सांगता करण्यात आली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अभिवादन सभेत जागविल्या दिवंगत चित्रकार अंभोरे यांच्या आठवणी; अंभोरे यांच्या स्मृती चिरंतन टिकविण्यासाठी कार्य करण्याचे आवाहन

नगर – दिवंगत चित्रकार श्रीधर अंभोरे स्नेह परिवाराच्यावतीने स्टेशन रोडवरील ग्रामीण विकास अभ्यास व संशोधन केंद्राच्या सभागृहात आयोजित अभिवादन सभेत मान्यवरांनी अंभोरे यांच्या आठवणींना उजाळा देत, त्यांच्या स्मृती चिरंतन टिकविण्यासाठी भरीव कार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.



दिवंगत चित्रकार श्रीधर अंभोरे यांना अभिवादन करण्यासाठी आयोजित सभेत बोलताना माजी आमदार लहू कानडे.

यावेळी बोलताना कवी व माजी आमदार लहू कानडे यांनी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार दिवंगत श्रीधर अंभोरे यांच्या स्मृती चिरंतन टिकविण्यासाठी सर्वांनी मिळून कार्य करूया, असे आवाहन केले. यावेळी व्यासपीठावर प्रसिद्ध शिल्पचित्रकार प्रमोद कांबळे, ज्येष्ठ कवी प्रकाश घोडके, ज्येष्ठ पत्रकार सतीश डेरेकर, संजय दळवी, मयूर भुजबळ, पुष्कर वाघ, विकी धारणकर, भाऊसाहेब थोरात, विकास कांबळे, ज्योती डेरेकर, तारा सातपुते, अर्जुन कांबळे, कवियत्री संजीवनी भालसिंग, मकरंद घोडके, प्राजक्ता गिरमकर, शहाजी सय्यद, अविनाश पडवळ, बालाजी बल्लाळ, राहुल गिरमकर, शब्दगंधचे सुनील गोसावी, भगवान राऊत यांच्यासह लेखक, कवी, चित्रकार व साहित्य रसिक उपस्थित होते.

व्यंगचित्रकार श्रीधर अंभोरे यांच्या आठवणींना उजाळा देताना माजी आमदार लहू कानडे म्हणाले, श्रीधर अंभोरे यांनी आयुष्यभर परिवर्तनवादी व प्रागतिक विचारावर अमर्याद प्रेम केले. ते नेहमी म्हणायचे, तथागत भगवान गौतम बुद्ध सांगून गेले की आपण इतके सुंदर जगलं पाहिजे की आपल्या मृत्यूचाही उत्सव झाला पाहिजे. चित्रकार श्रीधर अंभोरेंच्या मृत्यूनंतर त्यांचा उत्सव सगळीकडे साजरा होतोय.

अंभोरेंनी जे जे चितारलं त्याचा त्यांच्याकडे काहीही पुरावा ठेवत नसत. मात्र त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या स्नेहीजनांनी, लेखक, कवी, चित्रकारांनी त्यांचा हा चिरंतन आणि ऐतिहासिक ठेवा जपला पाहिजे. अंभोरे यांची समज खूप मोठी होती. त्यांच्यासोबतच्या पन्नास वर्षांच्या आयुष्यातील मैत्रीच्या खूप आठवणी होत्या. त्यावर एक स्वतंत्र पुस्तक होऊ शकेल. अंभोरे कोणाचीही हुबेहूब नक्कल करत असत. माझ्या अनेक पुस्तकांची मुखपृष्ठ त्यांनी चितारली. समाजासाठी ऋण फेडण्याची दानत चित्रकार श्रीधर अंभोरे यांच्यामध्ये होती. अलीकडच्या काळात जातीय उन्माद फार वाढला आहे. अशा कालखंडामध्ये व्यक्त होणारी माणसं जातात, हे मोठे दुःख आहे. त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी लोक हक्क फाऊंडेशनच्या वतीने एका चित्रकाराला पुरस्कार सुरू करूया आणि त्यासाठी सर्वांनी एकत्र येऊया, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी कवयित्री शर्मिला गोसावी, प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे, सिने अभ्यासक नंदकिशोर आढाव, कवी बाळ कांबळे, चित्रकार व कवी ल. दो. खराडे, प्रमोद जगताप, प्रियंका सातपुते, कवी प्रकाश घोडके, संजय थोरात, भाऊसाहेब देठे, नीलिमा बंडेलू यांनीही श्रीधर अंभोरे यांच्याविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या.

चित्रकार रवींद्र सातपुते यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. महबूब सय्यद यांनी सूत्रसंचालन केले. प्रियदर्शन बंडेलू यांनी आभार मानले. यावेळी चित्रकार रवींद्र सातपुते यांच्या पुढाकारातून दिवंगत चित्रकार श्रीधर अंभोरे यांनी चितारलेल्या विविध चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

# अनुराधा मिश्रा यांची आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत दमदार कामगिरी

## श्रीलंका येथील स्पर्धेत पटकावला स्ट्राँग वुमन ऑफ इंटरनॅशनल किताब

नगर – शहरातील सावेडी परिसरातील अनुराधा रत्नेश मिश्रा यांनी श्रीलंकेतील कोलंबो येथे झालेल्या आमंत्रित आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय यश संपादन केले. महिलांच्या मास्टर वन विभागात दमदार कामगिरी करत त्यांनी स्ट्राँग वुमन ऑफ इंटरनॅशनल हा मानाचा किताब आणि चषक पटकावला. त्यांच्या या यशामुळे आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात अहिल्यानगरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.



कोलंबो येथे झालेल्या आमंत्रित आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत अनुराधा मिश्रा यांनी दमदार कामगिरी करीत स्ट्राँग वुमन ऑफ इंटरनॅशनल किताब पटकावला.

श्रीलंका सरकार आणि संयुक्त भारतीय खेळ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने या आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत तब्बल १२० देशांतील खेळाडूंनी सहभाग नोंदविल्याने स्पर्धेला मोठे आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले होते. विविध देशांतील बलाढ्य खेळाडूंच्या उपस्थितीत झालेल्या या स्पर्धेत अनुराधा मिश्रा यांनी आपल्या ताकदीचे आणि कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन घडविले. पॉवरलिफ्टिंगमधील तीन प्रमुख प्रकारांमध्ये अनुराधा मिश्रा यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांनी स्क्वॉटमध्ये १५० किलो, बेंच प्रेसमध्ये ११० किलो आणि डेडलिफ्टमध्ये १८० किलो, असे एकूण ४४० किलो वजन उचलले. प्रचंड स्पर्धात्मक वातावरणात एवढे वजन उचलत त्यांनी आपल्या शारीरिक सामर्थ्यासोबतच तांत्रिक कौशल्य, सातत्य आणि मानसिक तयारीचे दर्शन घडविले. मास्टर वन महिला विभागात त्यांनी केलेल्या या दमदार कामगिरीची दखल घेत त्यांना स्ट्राँग वुमन ऑफ इंटरनॅशनल या मानाच्या किताबाने गौरविण्यात आले. या यशाबद्दल त्यांना चषक देऊन सन्मानित करण्यात आले. श्रीलंकेच्या पश्चिम प्रांताचे माजी मुख्यमंत्री इसरु देवप्रिय पेरोरा यांच्या हस्ते अनुराधा मिश्रा यांना हा चषक प्रदान करण्यात आला. त्यांना महाराष्ट्राचे अध्यक्ष व शिवछत्रपती पुरस्कार विजेते तुषार दारकर, सचिव तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते संतोष शिंदे आणि राष्ट्रीय पंच निशा शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

मिश्रा या सावेडी परिसरातील जिम स्ट्राईकर येथे प्रशिक्षक स्वप्निल मंडलिक यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करतात.

# फ्रेंड्स मान्सून कॉर्पोरेट टी-२० लीगमध्ये उपांत्य फेरीतील सामन्यांची चुरस वाढली

नगर – वाकोडी येथील साईदीप क्रिकेट ग्राऊंडवर सुरू असलेल्या फ्रेंड्स मान्सून कॉर्पोरेट टी-२० लीगमध्ये सामने दिवसेंदिवस अधिक रंगतदार होत असून, उपांत्य फेरीत स्थान मिळविण्यासाठी संघांमध्ये चांगलीच चुरस निर्माण झाली आहे. या आठवड्यात झालेल्या सामन्यांमध्ये विविध संघांनी दमदार कामगिरी करत विजय मिळविल्याने स्पर्धेतील उत्कंठा वाढली आहे.

काल झालेल्या पहिल्या सामन्यात नगर चॅम्पियन्स आणि इ लीं अहिल्यानगर यांच्यात सामना झाला. या सामन्यात नगर चॅम्पियन्स संघाने प्रभावी खेळ करत इ लीं अहिल्यानगरचा ४० धावांनी पराभव केला. नगर चॅम्पियन्सच्या विजयात संजू आल्हाट याची कामगिरी उल्लेखनीय ठरली. त्याला सामनावीर पुरस्कार देण्यात आला. दुसऱ्या सामन्यात नगर डिस्ट्रिक्ट सिनियर्स आणि शिवराज अ‍ॅडव्होकेट वॉरियर्स आमनेसामने आले. या सामन्यात नगर डिस्ट्रिक्ट सिनियर्स संघाने २६ धावांनी विजय मिळवत स्पर्धेतील आपले स्थान मजबूत केले. संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावणाऱ्या जावेद यांची सामनावीर म्हणून निवड करण्यात आली.

आज झालेल्या पहिल्या लीग सामन्यात शिवराज अ‍ॅडव्होकेट वॉरियर्स आणि इ लीं अहिल्यानगर यांच्यात चुरशीची लढत झाली. या सामन्यात शिवराज अ‍ॅडव्होकेट वॉरियर्सने दमदार कामगिरी करत १५ धावांनी विजय मिळविला. वैभव भगत याने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

आजच्या दुसऱ्या लीग सामन्यात क्रिकेट स्टार करंजी आणि नगर चॅम्पियन्स यांच्यात रंगतदार सामना झाला. क्रिकेट स्टार करंजीने नगर चॅम्पियन्सवर ११ धावांनी मात करत महत्त्वपूर्ण विजय नोंदविला. क्रिकेट स्टार करंजीच्या विजयात रोहित अकोलकर याची कामगिरी निर्णायक ठरली. त्याला सामनावीर पुरस्कार देण्यात आला.

या सामन्यांनंतर स्पर्धेतील गुणतालिकेचे चित्र अधिकच चुरशीचे झाले असून, उपांत्य फेरीत प्रवेश मिळविण्यासाठी संघांमध्ये मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे. प्रत्येक सामना पुढील फेरीच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरत असल्याने उर्वरित सामन्यांमध्ये विजयासाठी खेळाडू आपले सर्वस्व पणाला लावताना दिसणार आहेत. त्यामुळे स्पर्धेतील आगामी सामने अधिक रोमहर्षक होण्याची चिन्हे असून, खेळाडूंसह क्रिकेटप्रेमींची उत्कंठा शिगेला पोहोचली आहे.

# बालक मंदिर महिला मंडळ शाळेत स्वातंत्र्यदिन साजरा

नगर – आपल्या प्रत्येक कामातून देशभक्तीची कृती दिसून आली पाहिजे असे गौरवउद्गार लायन्स क्लबचे सेक्रेटरी सनी वधवा यांनी मनोगतातून विचार व्यक्त केले. बालक मंदिर महिला मंडळ शाळेत स्वातंत्र्यदिन उत्साहाने साजरा झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा सौ. ज्योतीताई केसकर होत्या. लायन्स क्लबचे अध्यक्ष अक्षत झालानी, सेक्रेटरी सनी वधवा तसेच खजिनदार अभिजीत भळगट यांची उपस्थिती होती. ध्वजारोहण पाहुण्यांच्या हस्ते झाले.



बालक मंदिर महिला मंडळ शाळेत स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अस्मिता शूळ यांनी प्रास्ताविकातून विचार व्यक्त केले की हुतात्म्यांच्या बलिदानामुळे गुलामगिरी नष्ट होऊन भारत स्वतंत्र होऊन आज ८० वर्ष पूर्ण झालेत. लहान वयापासूनच साक्षरते बरोबरच नैतिक विकास, मूल्यशिक्षण, पर्यावरण जागृती, भारतीयांबद्दलची आपुलकी, अर्थ व संगणक साक्षरता या सर्व गोष्टींचा विकास झाला तरच भारत विकसित राष्ट्र आणि महासत्ता बनेल. हे राष्ट्र देवतांचे या गीतावर मुलांनी कवायत सादर केली तसेच मुलींनी वंदे मातरम या गीतावर कवायत संचलन केले. इयत्ता पहिली ते तिसरीच्या बाल कलाकारांनी देशप्रेम कशाकशातून व्यक्त होते यावर उत्कृष्ट पथनाट्याचे सादरीकरण केले

स्वराज टकले, युवराज मारवाडे, स्तुती गायकवाड, प्रांजल गायकवाड, हर्षदा माडीकर, भाग्यश्री सोनवणे, अनन्या वाघमारे, कीर्ती वड्डेपेल्ली, कृष्णा सरडे, नचिकेत प्रजापती, कृष्णा देवरे, जोया सय्यद, अक्षय चव्हाण या विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, इंग्लिश भाषेतून आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ ज्योती केसकर यांनी राष्ट्रप्रेमाचे धडे या बालवयापासून मिळाल्यास निश्चितच प्रगती होईल अशी ग्वाही दिली. या कार्यक्रमासाठी महिला मंडळाच्या उपाध्यक्ष डॉ.सौ. विद्या होळेहोन्नूर, खजिनदार सौ. मेधा धोपावकर, सदस्या सौ. रोहिणी पुंडलिक उपस्थित होत्या.

कार्यक्रमात पाहुण्यांची ओळख निरुपमा देशपांडे, सूत्रसंचालन वैशाली सातपुते, विद्यार्थ्यांच्या कार्यक्रमाचे संयोजन सीमा कवाष्ठे, आभार प्रदर्शन ठकू पवार यांनी केले.

उत्कृष्ट फलक लेखन, रांगोळी, सजावट यासाठी अश्विनी मेंद्रे, सुकन्या बोली, हेमांगी भिडे, उज्वला क्यादर, बेबी ढोणे या सर्वांनी परिश्रम घेतले.

# कोहिनूर मॉल येथील बारा ज्योतिर्लिंग चित्र प्रदर्शनास प्रतिसाद

नगर – श्रावण महिन्यात नगरकरांना कोहिनूर मॉल येथे धार्मिक पर्वणीची अनुभूती देण्यासाठी केदारनाथ मंदिराची भव्य प्रतिकृती साकारण्यात आली आहे. तसेच चित्रकार प्रकाश बोरुडे यांनी साकारलेली भारतीय बारा ज्योतिर्लिंग ही चित्रमालिका श्रद्धा, संस्कृती, इतिहास आणि उत्कृष्ट चित्रकलेचा अद्वितीय संगम ठरली आहे. केदारनाथ मंदिरासह भाविक या चित्र प्रदर्शनातून १२ ज्योतिर्लिंगाचेही मनोभावे दर्शन घेत आहेत.



कोहिनूर मॉल येथे चित्रकार प्रकाश बोरुडे यांनी साकारलेली भारतीय बारा ज्योतिर्लिंग ही चित्रमालिका पाहताना विद्यार्थी.

या चित्र मालिकेतील प्रत्येक कलाकृती एका पवित्र तीर्थयात्रेचा अनुभव देत आहे. हे प्रदर्शन ३० ऑगस्टपर्यंत खुले राहणार आहे. पारनेर तालुक्यातील ढवळपुरी या गावातील सुपुत्र चित्रकार प्रकाश बोरुडे हे गेली दोन दशके भारतीय चित्रकलेच्या क्षेत्रात अखंड निष्ठेने कार्यरत आहेत. ग्रामीण संस्कार, भारतीय परंपरेबद्दलची आस्था आणि कलेप्रती असलेली अविरत साधना यांच्या बळावर त्यांनी आपल्या चित्रकलेला राष्ट्रीय स्तरावर एक वेगळी ओळख निर्माण करून दिली आहे. त्यांनी अहिल्यानगर येथील रचना कला महाविद्यालय तसेच पुणे येथील अभिनव कला महाविद्यालय येथे कला शिक्षण घेतले. ज्येष्ठ चित्रकार अर्जुनराव शेकटकर आणि ज्येष्ठ चित्रकार रंगनाथ बुकणे या गुरुवर्यांनी त्यांच्या कलागुणांना योग्य दिशा दिली.

चित्रकार प्रकाश बोरुडे यांच्या कलासाधनेचा ठसा देशातील अनेक प्रतिष्ठित धार्मिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय संस्थांपर्यंत पोहोचला आहे. पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात त्यांच्या कलाकृतींना मानाचे स्थान लाभले आहे. तसेच दिल्ली येथील नमामी गंगेच्या कार्यालयातही त्यांच्या चित्रकृती प्रदर्शित आहेत. याशिवाय त्यांनी विविध शासकीय संस्था, राष्ट्रीय स्तरावरील प्रदर्शनं आणि सांस्कृतिक उपक्रमांसाठीही उल्लेखनीय कलाकृती साकारल्या आहेत. प्रकाश बोरुडे यांच्या कलासाधनेची दखल देशाच्या सर्वोच्च स्तरावरही घेण्यात आली असून, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करून त्यांच्या कलासाधनेला विशेष मान्यता दिली आहे.

कोहिनूर मॉलमध्ये ॲक्रेलिक ऑन कॅनव्हास या माध्यमातून साकारलेल्या भारतीय बारा ज्योतिर्लिंग मालिकेच्या प्रत्येक कलाकृतीत त्यांनी त्या त्या ज्योतिर्लिंगाचे स्थापत्य वैभव, स्थानिक संस्कृती, निसर्गसौंदर्य, प्रकाश-अंधाराचा अद्भुत खेळ आणि भक्तीची दिव्यता अत्यंत प्रभावीपणे साकारली आहे. बारा ज्योतिर्लिंग ही भारताच्या आध्यात्मिक परंपरेची तेजस्वी प्रतीके आहेत. देशाच्या विविध भागांत विखुरलेली ही पवित्र तीर्थक्षेत्रे भारतीय संस्कृतीची अखंड परंपरा जपणारी आहेत. या प्रत्येक स्थळाचा इतिहास, पुराणपरंपरा, वास्तुशिल्प आणि धार्मिक महत्त्व यांचा सखोल अभ्यास करून प्रकाश बोरुडे यांनी प्रत्येक चित्रामध्ये त्या स्थानाचा आत्मा पकडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या चित्रांमध्ये रंग हे केवळ दृश्य माध्यम नसून भावनांची भाषा आहेत.

प्रकाश, सावली, वातावरण, भक्ती, शांतता आणि दिव्यता यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या प्रत्येक कॅनव्हासवर अनुभवायला मिळतो. प्रत्येक ब्रशस्ट्रोकमध्ये साधना आहे, प्रत्येक रंगछटेमध्ये श्रद्धा आहे आणि प्रत्येक चित्रामध्ये भारतीय संस्कृतीबद्दलचा अपार आदर व्यक्त होतो.

# अ.भा.वि.प. ची अहिल्यानगरमध्ये ४०० फुटी तिरंगा पदयात्रा

नगर – अखिल भारतीय विद्यार्थी परिषद अहिल्यानगर महानगरच्या केडगाव नगर शाखेतर्फे स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर शासकीय तंत्रनिकेतन, अहिल्यानगर येथे ४०० फूट तिरंगा पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. या पदयात्रेत महाविद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी तसेच अभाविपच्या कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.




भारताच्या राष्ट्रध्वजाविषयी विद्यार्थ्यांमध्ये अभिमान, राष्ट्रभक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक दृढ व्हावी, या उद्देशाने या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. हातात तिरंगा घेऊन मोठ्या संख्येने सहभागी झालेले विद्यार्थी आणि शिक्षक यामुळे संपूर्ण परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला.

यावेळी विद्यार्थ्यांनी 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. ४०० फूट लांबीचा तिरंगा घेऊन विद्यार्थ्यांनी केलेली पदयात्रा हे या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. या तिरंगा पदयात्रे नंतर सामूहिक वंदे मातरम् चे सामूहिक गायन झाले. त्यातही विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अभाविपच्या कार्यकर्त्यांसह शासकीय तंत्रनिकेतनमधील शिक्षक व विद्यार्थ्यांनी विशेष सहकार्य केले. विद्यार्थ्यांचा मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा कार्यक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले.यावेळी ८०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

यावेळी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य आगरकर, मेकानिकल डिपार्टमेंटचे करंजुळे, तसेच विद्यार्थी परिषदेचे जिल्हा संयोजक रोहन भुजबळ, महानगर मंत्री उत्कर्ष परदेशी, महानगर सहमंत्री वेदांत डांगे, शर्वरी क्षीरसागर, केडगाव नगर मंत्री संकेत गोरे, कार्यक्रम प्रमुख प्रेम गायकवाड व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.



अहिल्यानगरमधील समर्पण चातुर्मासमध्ये समर्पण दूत या बँकेचे लाभार्थी चंद्रकांत ज्वेल्स, सावेडीचे संचालक कांतीलाल कोठारी यांचा सत्कार करताना राजकुमार बोरा. समवेत चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक बोरा, संजय गुंदेचा, आदेश चंगेडिया व जामखेड येथील भुसार व्यापारी सुभाष भंडारी आदी.

# रक्तदानातून तरुणाईने जपली देशसेवेची भावना

## रक्तदान शिबिरात युवक-युवतींचा उत्स्फूर्त सहभाग

नगर – स्वातंत्र्यदिनाचा उत्साह सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून साजरा करत युवा एकसाथ फाऊंडेशनच्या वतीने शहरात ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. फाऊंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला युवक-युवतींचा प्रतिसाद मिळाला. देशसेवेची भावना मनात ठेवून अनेक युवक-युवतींनी स्वेच्छेने रक्तदान करत सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. फाऊंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे हे चौथे वर्ष होते.



स्वातंत्र्यदिनानिमित्त युवा एकसाथ फाऊंडेशनच्या वतीने रक्तदान शिबीर घेण्यात आले.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी रक्तदान करणाऱ्या युवक-युवतींचा फाऊंडेशनच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. रक्तदानासारख्या जीवनदायी उपक्रमात युवकांनी सहभागी होत समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी जपली. यावेळी नगरसेवक दत्ता गाडळकर, नगरसेवक महेश लोंढे, उद्योजक युवराज शिंदे, लक्ष्मण खोडदे, फाऊंडेशनचे मार्गदर्शक कुलदीप उमाप, फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष रोहित काळोखे, सचिव सुमित भिंगारदिवे, खजिनदार महेश साठे, संदेश कानडे, प्रीति क्षेत्रे, हर्ष शिरसाठ, प्रशांत कनगरे, प्रितेश मोहिते, यश शेकटकर, हर्ष वैराळ, प्रतीक सोनवणे, सागर मामड्याल, करण शर्मा, रवी मैड, अरुण ढाकणे, शेषराव आगळे, अक्षय आठरे आदींसह युवक उपस्थित होते.

आ. संग्राम जगताप म्हणाले, देशाच्या स्वातंत्र्यासाठी देशभक्तांनी दिलेला लढा आणि त्यांचे त्याग व बलिदान कधीही विसरता येणार नाही. त्यांच्या त्यागामुळे आजची ही स्वातंत्र्याची सुवर्ण पहाट आपण अनुभवत आहोत. सामाजिक जाणीव ठेवून युवा एकसाथ फाऊंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येणारे विविध उपक्रम प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.


रक्तदान ही देशसेवाच असून, आजच्या काळाची गरज बनली असून, युवा एकसाथ फाऊंडेशनने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून आयोजित केलेले रक्तदान शिबिर दिशादर्शक आणि प्रेरणादायी असल्याचे आ. जगताप यांनी नमूद केले. रक्त हे बाजारात तयार होत नाही. एखाद्या गरजू व्यक्तीला रक्ताची गरज भासल्यास माणूसच माणसाच्या मदतीला धावून जातो. त्यामुळे युवकांनी रक्तदानासाठी पुढाकार घेत समाजातील गरजूंच्या जीवनाला आधार द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष रोहित काळोखे म्हणाले की, युवा एकसाथ फाऊंडेशनच्या वतीने दरवर्षी स्वातंत्र्यदिन रक्तदान शिबिराच्या माध्यमातून साजरा केला जातो. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने केवळ उत्सव साजरा न करता सामाजिक बांधिलकी जपण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. लहान मुलांमध्ये देशभक्तीची भावना रुजावी तसेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, यासाठी फाऊंडेशनच्या वतीने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थी व युवकांना योग्य दिशा देण्याचे काम संस्थेकडून सातत्याने सुरू असल्याचे काळोखे यांनी स्पष्ट केले.

कुलदीप उमाप यांनी युवकांच्या पुढाकाराने सामाजिक परिवर्तन घडणार असून, युवकांनी सामाजिक कार्यात योगदान देण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले. रक्तदान शिबिरासाठी अष्टविनायक ब्लड बँकेचे सहकार्य लाभले. शिबिरात रक्तदान करणाऱ्या सर्व युवक-युवतींचा फाऊंडेशनच्या वतीने सन्मान करण्यात आला.

# जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त २० ऑगस्टला मेकअप कार्यशाळा

नगर – येथील स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळ व भगवान जिव्हेश्वर मंदिर, दिल्लीगेट यांच्या संयुक्त विद्यमाने भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त बागडपट्टीत जिव्हेश्वर भवन येथे २० ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता सर्वांसाठी विनामूल्य मेकअप प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला आहे.



नक्षत्रा कांबळे

महिला व युवतीचा कल स्मार्ट दिसण्याकडे असतो. त्यामध्ये आपले व्यक्तिमत्व अधिक सुंदर व आकर्षक दिसण्यासाठी प्रत्येक महिलेचा प्रयत्न असतो. आपण छान आवरलय पण काही तरी कमी वाटतंय, असा विचार महिलांच्या मनात येतो. त्यासाठी स्वतःचा प्रोफेशनल मेकअप स्वःताच शिका, तसेच स्किन व पर्सनालिटीप्रमाणे मेकअप, ड्रेपिंग, हेअर केअर याचे मार्गदर्शन व काही खास मॅजिक टिप्स या कार्यशाळेत देण्यात येणार आहे. यामध्ये युवा मेकअप आर्टिस्ट नक्षत्रा कांबळे या कार्यशाळेत विनामूल्य मार्गदर्शन करणार आहेत. या मोफत प्रशिक्षण वर्गाचा जास्तीत जास्त युवती व महिलांनी लाभ घ्यावा व उपस्थित राहावे, असे आवाहन स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



# वायुदलाची धावपट्टीच विकली!

चोर, चोरी, चोरीचे प्रताप आणि तत्सम अनेक घटना आजवर प्रत्यक्षात घडल्या आहेत आणि काही घटना तर चित्रपटांतूनही अनेकांनी पाहिल्या आहेत. फसवाफसवीचे हे प्रकार कायमच चर्चेचा विषय ठरत असताना आता त्यात आणखी एका भयंकर प्रकरणाची भर पडली आहे.

पंजाबच्या फिरोजपूरमधील हा प्रकार असून, तिथे एका माय-लेकाच्या जोडीने घर, शेतशिवार नव्हे, तर चक्क अशी वस्तू विकली आहे, जी पाहून भल्याभल्यांना घामच फुटला. उपलब्ध माहितीनुसार या आई आणि मुलाने वायुदलाची ऐतिहासिक धावपट्टीच विकली. याच धावपट्टीवर १९६२, १९६५ आणि १९७१ च्या युद्धांच्या वेळी भारतीय वायुदलाची विमाने उतरली होती. २८ वर्षापूर्वीच्या या कारनाम्याचा उलगडा नुकताच झाला असून उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर या मायलेकाच्या जोडीविरोधात विविध कलमांअंतर्गत फिर्याद दाखल करण्यात आली.

एका तक्रारीनंतर हे संपूर्ण प्रकरण उघडकीस आले. निशान सिंह यांनी 'पंजाब व्हिजीलन्स ब्यूरो'च्या अध्यक्षांना उद्देशून एक पत्र लिहून तपास करण्याची मागणी केली. दुमनी गावातील उषा अंसल आणि तिचा मुलगा नवीनचंद अंसल याने काही अधिकाऱ्यांच्या साथीने पद्धतीने 'भूखंडावर मालकी हक्क सांगत त्याची विक्री कशी केली हे त्यांनी दाखवून दिले. प्राथमिक स्वरुपात तक्रार करूनही तपास झाला नाही, असे कळताच निशान सिंग यांनी पंजाब- हरियाणा न्यायालयात याचिका दाखल केली आणि न्यायालयाने या प्रकरणाचा तपास करण्याचे आदेश दिले. तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार भारत आणि पाकिस्तान सीमेनजीक फत्तुवाला गावात ही हवाई पट्टी असून १२ मार्च १९४५ मध्ये ब्रिटीश शासनाने दुसऱ्या महायुद्धादरम्यान 'रॉयल एअरफोर्स'साठी ती अधिग्रहित केली होती. पुढे हीच धावपट्टी भारतीय वायुसेनेच्या ताब्यात आली आणि तीन युद्धांमध्ये तिचा वापर करण्यात आला. बहुतांशी लँडिंग ग्राऊंड म्हणून तिचा वापर झाला होता.

या प्रकरणाच्या मुळाशी पोहोचण्याचा प्रयत्न झाला तेव्हा उषा अंसल आणि नवीनचंद अंसल याने काही अधिकाऱ्यांच्या मदतीने हेराफेरी करत आपणच या जमिनीचे मालक असल्याचे भासवले आणि ती १९९७ मध्ये ती विकून टाकली. मदन मोहन लाल नामक व्यक्ती या जमिनीचे मूळ मालक असून त्यांचा मृत्यू १९९१ मध्ये झालेला असतानाही १९९७ मध्ये त्यांच्याच नावे बनावट कागदपत्र तयार करण्यात आले. न्यायालयीन हस्तक्षेप आणि कठोर ताशेऱ्यानंतर अखेर मे २०२५ मध्ये ही जमीन औपचारिक स्वरुपात पुन्हा एकदा संरक्षण मंत्रालयाकडे सोपवण्यात आली.

# कॅलिडोस्कोप

# झाड कोसळल्याने व्यक्ती झाली लखोपती!



बेंगळुरुमध्ये एक झाड कोसळल्याने एक व्यक्ती तब्बल २८लाखांचा मालक झाले आहे. एन. जी. केसरी असे या लखपती झालेल्या व्यक्तीचे नाव असून झाड पडणे या ८५ वर्षीय व्यक्तीच्या पथ्यावर पडले असून त्यांना मोठा आर्थिक लाभ झाला आहे; मात्र यासाठी या व्यक्तीला तब्बल चार दशके वाट पहावी लागली. या व्यक्तीने चार दशकांपूर्वी त्याच्या घराच्या अंगणात आपोआप उगवलेल्या झाडातून ही कमाई केली आहे. अर्थात आता या झाडासाठी एवढी किंमत मोजण्यात आली त्यावरून यात काही खास गुणधर्म असतील हे साहजिक आहे. हे पडलेले झाड चंदनाचे होते. हे झाड वाढावे आणि नीट मोठे व्हावे, यासाठी केसरी त्याची काळजी घ्यायचे. ते लहान असतानाच हे झाड उगवल. ते काढून टाकण्याऐवजी त्यांनी त्याला वाढवण्याचा निर्णय घेतला. त्यांनी अगदी रोपट्यापासून मोठा चंदनाचा वृक्ष होईपर्यंतचा या झाडाचा प्रवास पाहिला आहे. चंदनाचे झाड आपल्याच अंगणात वाढवणे आणि ते सुखरुप ठेवणे हे सुद्धामोठे आव्हान असते. कारण हे झाड वाढत जाते तसे त्याच्या विशिष्ट सुंगधामुळे चंदनाची तस्करी करणाऱ्यांचे आणि चोरांचे लक्ष अशा झाडांकडे आकर्षित होते. झाड थोडे मोठे झाल्यानंतर ते सुरक्षित राहावे, म्हणून केसरी यांनी त्याच्याभोवती लोखंडाची एक मजबूत जाळी लावली. त्यामुळेच हे झाड अनेक वर्ष 'जैसे थे' स्थितीत राहिले. या वर्षी मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यात हे झाड तग धरू शकले नाही.

शेजारचे भले मोठे झाड या चंदनाच्या झाडावर पडल्याने ते मुळासकट उन्मळून पडले. त्यांनी स्वत: चंदनाच्या झाडाचे लाकूड विकण्याऐवजी वनविभागाला फोन करून याची माहिती दिली. त्यांनी सर्व आवश्यक परवानग्या मिळवल्यानंतर पडलेल्या झाडाचे व्हॅल्यूएशनही म्हैसूरमधील सरकारी चंदन डेपोमध्ये करून घेतले. या व्हॅल्यूएशनदरम्यान पडलेल्या चंदनाच्या झाडाचे वजन एक टन असल्याचे समोर आले. भारतात चंदनाचा सर्वाधिक वापर करणाऱ्या कंपन्यांमध्ये समावेश होणाऱ्या 'कर्नाटक सोप्स अँड डिटर्जंट्स लिमिटेड'ने हे चंदन विकत घेतले. या सौद्यामध्ये केसरी यांना सुमारे २८ लाख रुपये मिळाले. केसरी यांच्यासाठी हे झाड फार खास होते. कारण ४० वर्षाहून अधिक काळ झाडाचे रक्षण आणि संवर्धन करण्याच्या त्यांच्या निष्ठेची दखल कर्नाटक सरकारनेही घेतली होती. राज्य सरकारने केसरी यांचा 'चंदन शिरोमणी' पुरस्कार देऊन गौरवले होते.

# उसनवारी १७ वर्षांनी व्याजासह परत!

मैत्री आणि नात्यात कधीही पैसा आणू नये असे म्हणतात. याचे कारण पैसा आला, की मग वाद होतात आणि त्याचा परिणाम मैत्रीवर होते; पण मित्र सच्चा असेल तर मग पैसा ही फार क्षुल्लक गोष्ट ठरते. म्हणजे एखादा प्रामाणिक मित्र असेल आणि त्याने




उसने पैसे घेतले असतील तर तो काही करून ते परत करतोच. अशीच एक घटना सध्या सगळीकडे चर्चेत आहे. एका व्यक्तीने मित्राकडून घेतलेले एक हजार रुपये रुपये तब्बल ३५ वर्षांनी परत केले आहेत. व्याजासकट त्याने हे पैसे परत करत आपले वचन पाळले आहे. महत्त्वाचे म्हणजे या मित्राचा शोध घेत त्याने त्याला गाठले आणि पैसे परत केले.


सौदी अरेबियातील मित्राकडून घेतलेली अल्पशी रक्कम परत करण्याच्या उद्देशाने केरळमधील एका व्यक्तीने त्या मित्राचा शोध घेण्यास सुरुवात केली. फोन नंबर, पत्ता किंवा संपर्काची कोणतीही माहिती नसताना, इस्माईल आपल्या 'एडला लचन्ना' या जुन्या सहकाऱ्याचा शोध घेण्यासाठी निघाले होते. दोघांची भेट होऊन अनेक वर्ष उलटून गेली होती. शोध घेता घेता अखेर ते तेलंगणाच्या धरमपुरी येथे पोहोचले. इथे त्यांना त्यांचा जुना मित्र भेटला आणि त्यांनी कित्येक वर्ष मनावर असलेले कर्जाचे ओझे उतरवत पैसे परत केले. सौदी अरेबियातील 'अब्काईक' येथे काम करत असताना १९९१मध्ये इस्माईल आणि लचन्ना यांची मैत्री झाली. ते इतर तीन कामगारांसोबत एकाच घरात वास्तव्यास होते. जवळपास पाच वर्षे ते एकत्र राहिले. त्या काळात इस्माईलने लचन्नाकडून १२० सौदी रियाल उसने घेतले होते.

# फॉलोअर्स वाढवा, मोफत जेवा

ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी रेस्टॉरंट मालक वेगवेगळ्या युक्त्या लढवतात. कोणी सवलती जाहीर करतं तर कोणी काही वस्तू दिल्यावर एखादा




पदार्थ मोफत खिलवतात. पण इटलीतलं एक रेस्टॉरंट अनोखं आहे. इथे येऊन रेस्टॉरंटचे फोटो इंस्टाग्रामवर अपलोड करणाऱ्या ग्राहकांना मोफत जेवण दिलं जातं. सोशल मीडिया हे सध्याच्या काळातलं प्रसिद्धीचं सर्वात प्रभावी माध्यम आहे. याच माध्यमाचा वापर करून या रेस्टॉरंटला प्रसिद्धी मिळवायची आहे. हे रेस्टॉरंट इटलीतल्या मिलान शहरात आहे. 'धीस इज नॉट अ सुशी बार' असं या रेस्टॉरंटचं नाव आहे. हे जपानी रेस्टॉरंट आहे. या रेस्टॉरंटमध्ये मोफत जेवण्याआधी इथे एखादी डिश ऑर्डर करावी लागेल. मग या डिशचा फोटो काढून 'धीस इज नॉट अ सुशी बार' या हॅशटॅगअंतर्गत पोस्ट करावा लागतो. मग युजर्सच्या फॉलोअर्सच्या संख्येनुसार मोफत जेवण देण्याचा निर्णय घेतला जातो. एक ते पाच हजार फॉलोअर्स असणाऱ्यांना एक प्लेट सुशी किंवा साशिमी मोफत दिलं जातं. पाच ते दहा हजार फॉलोअर्स असतील तर दोन प्लेट जेवण मोफत दिलं जातं. इन्स्टाग्रामवर फॉलोअर्स वाढवले तर तुम्हाला मोफत जेवण मिळू शकतं, असा हा फंडा आहे.




# घरीच प्रसूती बेतली जीवावर

तमिळनाडूच्या तिरुपूर जिल्ह्यातून एक अत्यंत दु:खद आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. येथे एका तरुणाने यूट्यूबवरील व्हिडीओ पाहून आपल्या पत्नीची प्रसूती घरीच करण्याचा प्रयत्न केला. या अत्यंत निष्काळजीपणामुळे त्या महिलेचा मृत्यू झाला. उथुकुली येथील थलावाईपालयम भागात राहणाऱ्या शशिकला यांची पहिली प्रसूती सिझेरियनद्वारे (शस्त्रक्रियेद्वारे) झाली होती; मात्र या वेळी नैसर्गिक प्रसूती होईल या आशेने, त्यांनी पती आणि सासू यांच्या मदतीने कोणत्याही वैद्यकीय सल्ल्याशिवाय किंवा देखरेखीशिवाय घरीच बाळंतपणाचा प्रयत्न केला. यासाठी तयारी म्हणून पतीने यूट्यूबवर अनेक व्हिडीओ पाहिले. त्यानंतर, शशिकला यांचे पती कार्तिक आणि सासू यांनी प्रसूती प्रक्रियेत मदत केली. नैसर्गिक प्रसूतीचा प्रयत्न सुरू असताना वार (प्लासेंटा) योग्यरित्या बाहेर न आल्यामुळे महिलेला अतिरक्तस्त्रावाचा (हेमरेज) त्रास झाला. त्यांना तातडीने पेरुंदुराई येथील सरकारी रुग्णालयात आणि नंतर कोईम्बतूरमधील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. सर्व प्रयत्न करूनही शशिकला यांचे निधन झाले; मात्र डॉक्टरांना नवजात मुलीचे प्राण वाचवण्यात यश आले.

बिहारमध्ये एक विचित्र घटना घडली असून संपूर्ण राज्यात याच घटनेची चर्चा आहे. येथील मुझफ्फरपूर जिल्ह्यात एका ८२ वर्षीय वृद्धाला बँकेने थक्क केले. बँकेत आपल्या पेन्शनचे पैसे काढण्यासाठी 'कॉमन सर्व्हिस सेंटर'वर (सीएससी) गेलेल्या या व्यक्तीच्या बँक अकाऊंटवर तब्बल ७५९ कोटी रुपये असल्याचे समोर आले. एवढी रक्कम पाहून या व्यक्तीला आश्चर्याचा धक्काच बसला आहे. या व्यक्तीचे नाव कवेश्वर मिश्रा असे आहे. कवेश्वर मिश्रा हे सामाजिक सुरक्षा पेन्शन योजनेचे लाभार्थी आहेत.

पेन्शन योजनेअंतर्गत मिळणारे महिन्याभराचे पैसे

# खात्यात अचानक ७५९ कोटी?


काढण्यासाठी कवेश्वर त्यांच्या दिव्यांग मुलासोबत सीएससी केंद्रावर गेले होते. कवेश्वर यांच्या मुलाला दिव्यांगासाठी मिळणारी पेन्शन मिळत असल्याने दोघेही सोबतच गेले होते. पेन्शनची रक्कम काढल्यानंतर कवेश्वर यांनी आपल्या बँक खात्यात किती रुपये आहेत हे तपासून पाहिले असता समोरचा आकडा बघून त्यांच्या त्यांच्या डोळ्यांवर विश्वासच बसत नव्हता. कवेश्वर यांच्या खात्यामध्ये ७५९ कोटी ६९ लाख ५१ हजार ९५१ रुपये असल्याचा मेसेज स्क्रीनवर झळकला. म्हणजेच पेन्शनसाठी आलेल्या या व्यक्तीच्या खात्यावर ७५९ कोटी रुपये होते. कवेश्वर यांनी आश्चर्यचकित होऊन आपल्या मुलाचे अकाऊंट तपासले असता तिथेही




अशाचप्रकारे भरमसाठ रक्कम असल्याचे दिसून आले. बाप-लेकाच्या खात्यांवर एकूण दीड हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक पैसे असल्याचे बॅलेन्स तपासून पाहिल्यानंतर समोर आले. आपल्या खात्यात एवढी रक्कम कशी आणि कुठून आली याची आपल्याला काहीच कल्पना नसल्याचे कवेश्वर यांनी म्हटले आहे. त्यांनी स्वत: या प्रकरणात बँकेच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदवताना एवढी रक्कम आपल्या खात्यावर कशी आली याची चौकशी करण्याची मागणी केली. आपल्या खात्यावरील रक्कमेची पडताळणी करावी आणि यात काही चूक असल्यास ती कृपया दुरुस्त करा, अशी विनंतीवजा मागणी कवेश्वर यांनी बँक अधिकाऱ्यांकडे केली.

# उंटांचं रुग्णालय

प्राण्यांसाठीही रुग्णालयं असतात. प्राण्यांवर शस्त्रक्रियाही केल्या जातात. सर्वसाधारणपणे सर्व प्राण्यांवर एकाच ठिकाणी उपचार होतात. मात्र दुबईमधलं एक रुग्णालय खूपच अनोखं आहे. या रुग्णालयात फक्त उंटांवर उपचार केले जातात. हे रुग्णालय खास उंटांसाठीच तयार करण्यात आलं आहे. 'दुबई कॅमल हॉस्पिटल' या नावाने ते ओळखलं जातं. दुबई हा आखाती देश. या भागात वाळवंट असल्यामुळे वाहतुकीसाठी उंटांचा वापर होतो. हे रुग्णालय उभारण्यासाठी भारतीय चलनात सुमारे ७१ कोटी रुपये खर्च झाले आहेत. हे रुग्णालय २०१७ मध्ये सुरू झालं होतं. उंटांसाठीचं हे खास रुग्णालय आता जगभर प्रसिद्ध झालं आहे. या रुग्णालयात संयुक्त अरब अमिरातीतून उंट आणले जातात. इथे ६५ कर्मचारी आहेत. त्यात परदेशी तज्ज्ञांचाही समावेश आहे. या ठिकाणी एकाच वेळी २२ उंटांवर उपचार करण्याची सोय आहे. उंटांवर उपचार करण्यासाठी बरेच पैसे




आकारले जातात. अल्ट्रासाउंड चाचणीसाठी आठ हजार रुपये आकारले जातात तर साध्या शस्त्रक्रियेसाठी ७० हजार रुपये घेतले जातात. या ठिकाणी पाच मीटर उंचीचं एंडोस्कोपी मशीन आहे. जगभरात अशी फक्त तीन एंडोस्कोपी मशीन्स आहेत. यापैकी दोन अमेरिकेत आहेत. हाड मोडलेल्या उंटांना इथे आणलं जातं. संयुक्त अरब अमिरातीत उंटांच्या मॅरेथॉनचं आयोजन केलं जातं. या दरम्यान उंटांना दुखापती होतात. अशा उंटांना इथे आणलं जातं.

सार्वजनिक बसचे कंडक्टर प्रवाशांसह अरेरावीची भाषा करतात. सुट्ट्या पैशांवरून वाद घालतात. कर्नाटकचे परिवहन मंत्री बायराथी सुरेश यांनी सर्वसाधारण प्रवाशाचा वेष धारण करून बेंगळुरुमधील 'बीएमटीसी' बसची अचानक पाहणी केली. या सरप्राईज भेटीत त्यांना धक्कादायक अनुभव आला. या दौऱ्यादरम्यान खुद्द मंत्र्यांना एक अत्यंत त्रासदायक अनुभव आला. हेब्बल ते नागशेट्टीहल्ली मार्गावर प्रवास

# परिवहन मंत्र्यांनाच बसमधून उतरवले!



करत असताना, जेव्हा त्यांनी भाड्यासाठी शंभर रुपयांची नोट दाखवली, तेव्हा सुट्टे पैसे नसल्याचे कारण देत बस कंडक्टरने त्यांना बसमधून उतरण्यास सांगितले.

बसमध्ये प्रवासी म्हणून चढलेल्या परिवहन मंत्र्यांना कंडक्टरने ओळखलेच नाही. या कंडक्टरचे प्रवाशांसोबतचे वर्तन पाहून परिवहन मंत्र्यांनी त्याला तडकाफडकी निलंबित केले. कंडक्टरचे एक वाक्य ऐकून परिवहन मंत्री संतापले. परिवहन मंत्री बायराथी सुरेश यांनी एक सामान्य प्रवासी असल्याचे भासवून सुमारे दोन तासात दहाहून अधिक बसमधून प्रवास केला. या अचानक तपासणीदरम्यान, मंत्र्यांनी निष्काळजीपणा आणि नियमांचे उल्लंघन केल्याचे कारण देत, बीएमटीसी (बस क्रमांक केए-५७ एफ-३३७२) चे चालक आणि वाहक यांना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्याचा आदेश जारी केला. परिवहन कर्मचाऱ्यांमध्ये शिस्त लागू करण्यासाठी आणि उत्तरदायित्व वाढवण्यासाठी बायराथी सुरेश यांनी ही कारवाई केली.

तपासणीदरम्यान, अनेक धक्कादायक बाबी मंत्र्यांच्या निदर्शनास आल्या. एका प्रवाशाने उतरण्याचा स्पष्ट इशारा देऊनही, बस क्रमांक (केए-५७एफ-३३७२) चे चालक आणि वाहक 'फन वर्ल्ड' बस थांब्यावर थांबले नाहीत. प्रवाशांप्रति असलेले हे बेजबाबदार वर्तन आणि निष्काळजीपणा गंभीर मानून, परिवहन मंत्र्यांनी दोन्ही कर्मचाऱ्यांना जागेवरच निलंबित करण्याचे आदेश दिले. नागशेट्टीहल्ली येथील एका ऑटो-रिक्षा चालकाच्या प्रकरणातही मंत्र्यांनी हस्तक्षेप केला. भाडे मीटरमध्ये तीस रुपये दिसत असूनही कथितरित्या ३६रुपये मागत होता. आपली ओळख न सांगता मंत्री बसमधून खाली उतरले.

# शिपायाची शिक्षा अखेर रद्द!

झारखंडमध्ये एका सरकारी कार्यालयातून चहा पावडर आणि बिस्किटे घरी नेणाऱ्या शिपायाला कामावरून काढून टाकल्याचा प्रकार घडला आहे. या कर्मचाऱ्याने उच्च न्यायालयात दाद मागताच त्याला परत कामावर घेण्याचे आदेश देण्यात आले आहे. झारखंड उच्च न्यायालयाने बोकारो जिल्हा ग्रामीण विकास संस्थेतील (डीआरडीए) कंत्राटी शिपाई रणजित कुमार हिमांशू यांची सेवा समाप्त करण्याचा निर्णय रद्द केला आणि त्यांना पुन्हा कामावर घेण्याचे आदेश दिले. सरकारच्या या कारवाईला असंवेदनशील आणि न्यायाच्या तत्त्वांच्या विरोधात असल्याचे नमूद करत, न्यायालयाने स्पष्ट केले, की किरकोळ आरोपांसाठी कठोर शिक्षा देणे अयोग्य आहे. बोकारो येथील 'डीआरडीए' मध्ये सुमारे १७ वर्षापासून कंत्राटी तत्त्वावर काम करणाऱ्या रणजित कुमार हिमांशू यांच्यावर कार्यालयातून चहा पावडर आणि काही बिस्किटे घरी नेल्याचा आरोप होता. या आरोपानंतर तत्कालीन उप-विकास आयुक्तांनी १६ मार्च २०२२ रोजी त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली; मात्र त्या नोटीसमध्ये नेमक्या कोणत्या वस्तू गहाळ झाल्या होत्या, याचा उल्लेख नव्हता. रणजित यांनी त्यानंतर त्या वस्तू परत केल्या असल्या, तरीही २ मे २०२२ रोजी त्यांची सेवा समाप्त करण्यात आली.

न्याय मिळवण्यासाठी रणजित यांनी झारखंड उच्च न्यायालयात धाव घेतली. सुनावणीदरम्यान, त्यांच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले, की त्यांनी




उरलेली चहा पावडर आणि बिस्किटे घरी नेल्याची कबुली दिली होती आणि नोटीस मिळाल्यानंतर त्या वस्तू परतही केल्या होत्या. असे असूनही, पुरेसे कारण किंवा सविस्तर चौकशीशिवाय त्यांची सेवा समाप्त करण्यात आली. मुख्य न्यायमूर्ती एम. एस. सोनाक आणि न्यायमूर्ती राजेश शंकर यांच्या खंडपीठाने या प्रकरणावर सुनावणी केली आणि प्रशासकीय कारवाईबाबत कठोर निरीक्षणे नोंदवली. न्यायालयाने म्हटले, की कर्मचाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई निश्चित करताना आरोप आणि शिक्षा यांच्यात समतोल असणे आवश्यक आहे. जर त्या चुकीमुळे सरकारी यंत्रणेचे गंभीर नुकसान झाले नसेल, तर सर्वात कठोर शिक्षा देणे न्याय्य मानले जाऊ शकत नाही.

